[…]प्राइझ कमीटीनें पसंत केलें

नशीब आणि उद्योग.

हा निबंध

मोरो गणेश लोंढे

नागांव, तालुका अलीबाग, जिल्हा कुलाबा, येथील मराठी शाळेंतील शिक्षक यांणीं लिहिला.

'तथापि मामकी भक्तिश्चंद्रचूडेऽभिजायते ! '

आवृत्ति पहिली. प्रति १०००.

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिला.

सन १८९६.

किंमत ।-॥ आणे.

अ/५/७५

दक्षिणाप्राइझ कमीटीनें पसंत केलेला

नशीब आणि उद्योग.

हा निबंध

मोरो गणेश लोंढे

नागांव, तालुका अलीबाग, जिल्हा कुलाबा,
येथील मराठी शाळेंतील शिक्षक

यांणीं लिहिला.

'तथापि मामकी भक्तिश्चंद्रचूडेऽभिजायते!'

आवृत्ति पहिली. प्रति १०००.

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिला.

सन १८९६.

किंमत ।-॥ आणे.

प्रस्तावना.

पावसाळ्यांत पुष्कळ पाऊस पडला, ह्मणजे जिकडे तिकडे गारेगार होऊन जातें. कांहीं दिवसांनीं सर्व पृथ्वी हिरव्या गवतानें व धान्यांकुरांनीं भरून जाते, झाडेंवेली प्रफुल्ल होतात, डोंगरावरून स्वच्छ उदकाचे प्रवाह वाहूं लागतात, व सर्व पृथ्वीला अप्रतिम शोभा येते. परंतु उन्हाळ्यांत सर्व प्रकार याच्या उलट असतो. जलाशय कोरडे पडतात, झाडेंवेली निस्तेज होतात, गवताचें नांवही उरत नाहीं, व उन्हानें जिकडे तिकडे लाही लाही होत असते ! पावसाळ्यांतली अप्रतिम शोभा उन्हाळ्यांत कोठली आढळावयाला ! परंतु यत्नानें त्यांतली कांहीं शोभा उन्हाळ्यांतही आणतां येते. कृत्रिम व अकृत्रिम गोष्टींत अंतर हें असणारच. कृतीनें पिकवलेल्या फळांस झाडांवर पक्क झालेल्या फळांची चव येणार नाहीं हें उघड आहे. तसेंच पावसाळ्यांतली सृष्टिजन्य शोभा उन्हाळ्यांत उत्पन्न करणें अशक्य आहे, तरी यत्नानें त्यांतली बरीच शोभा साध्य करितां येते. नदीच्या कांठची एखादी जागा मिळवावी, ती साफ करावी, तेथें झाडें लावावीं, रहाट किंवा मोट लावून त्या जागेवर शिंपणें करावें, ह्मणजे त्या ठिकाणीं वरील शोभा अंशतः तरी आपल्यास दिसेल; व ती जरी थोडी असली, तरी आसपासच्या रुक्ष प्रदेशाकडे अवलोकन केल्यावर ती आपल्यास विशेष रम्य दिसेल व विशेष आनंद देईल. त्याचप्रमाणें ग्रंथकारांच्या मनास स्वाभाविक स्फूर्ति उत्पन्न झाल्यावर जे ग्रंथ तयार होतील, ते सृष्टीच्या स्वाभाविक सौंदर्याप्रमाणें किंवा झाडांवर पक्क झालेल्या फळांप्रमाणें उत्तम होतील यांत शंका नाहीं; परंतु असा सुबत्तेचा काळ येई तोंपर्यंत वाट पहात बसलें पाहिजे, तेव्हां ते ग्रंथ आह्मांस

पहावयास मिळतील. आज तसा एखादा ग्रंथ मिळावा अशी इच्छा असल्यास, तो यत्नाशिवाय मिळणार नाहीं; हें मनांत आणून कैलासवासी **जावजींनीं** 'नशीब आणि उद्योग' या विषयावर निबंध लिहिणारास बक्षीस देण्याचें ठरविलें. या त्यांच्या प्रयत्नापासून जीं बरींवाईट अनेक फळें निर्माण झालीं, त्यांतलेंच हें एक आहे.

कैलासवासी **जावजी शेट** यांनीं एक उत्तम फळ पाहून वाचकवर्गास अर्पण केलेंच आहे. हें दुसरें फळ **दक्षिणाप्राइझ कमीटीनें** आपला उदार आश्रय दिल्यामुळें वाचकांच्या हातीं पडत आहे. याच्या रसाची गोडीही ते घेतील अशी ग्रंथकर्त्यांस फार आशा आहे.

नागांव, ता. १ एप्रिल १८९६.

मोरो गणेश लोंढे.

विषयानुक्रम.

नशीब आणि उद्योग.

१ सामान्य विचार.

१ जोंपर्यंत इतर देशांविषयीं अज्ञान असतें, तोंपर्यंत आपल्या देशाविषयीं—मग तो इंग्लंड देशासारखा सुधारलेला असो, अथवा अमेरिकेंतल्या इन्डियनांच्या देशासारखा अज्ञानमग्न असो,—रिकामा अभिमान मनुष्याच्या मनांत भरलेला असतो. आपला देश चांगला, आपल्या चालीरीती चांगल्या, आपलीं कलाकौशल्यें चांगलीं, आपले लोक चांगले, सारांश आपलें सर्व चांगलें, अशी आपल्या मनाची वृत्ति बनून गेलेली असते. पूर्वींचे **आर्य** लोक आपल्यास ' आर्य ' हें विशेषण लावीत; **पोर्तुगीज** लोक **ख्रिस्ती** लोकांशिवाय इतरांस 'अपवित्र' समजत; **मुसलमान** लोक आपल्या लोकांशिवाय इतरांस नास्तिक समजतात; व **इंग्लिश** लोक अद्यापही ' **इंग्लंदांत** जन्मलेल्याची ' थोरवी मानतात; हीं या गोष्टीचीं मोठालीं उदाहरणें आहेत. आपल्या देशाविषयीं किंवा तेथील वस्तूंविषयीं योग्य अभिमान असणें वाईट नाहीं, परंतु आपलें—मग तें कसेंही असो—तें चांगलें ह्मणावयाचें, अशी वृत्ति चांगली नाहीं. परंतु ही वृत्ति ज्ञानाचा प्रसार झाल्याशिवाय व इतर देशांविषयीं खरी माहिती झाल्याशिवाय नाहींशी होत नाहीं. इतर देशांविषयीं माहिती झाली—ज्ञान वाढलें—ह्मणजे ही अज्ञानाची वृत्ति सहज नाहींशी होऊं लागते. आपलाच देश आपल्यास

माहीत आहे, तोंपर्यंत तो मोठा. इतर देशांचें ज्ञान झालें व आपल्या देशाची इतर देशांशीं तुलना करितां आली, ह्मणजे खरोखर मोठा देश कोणता हें समजतें. खंडाचें ज्ञान झालें, ह्मणजे देश लहान. पृथ्वीविषयीं विचार करूं लागलें, ह्मणजे खंडालाही लहानपणा येणार, मग देशाची काय कथा! सूर्याशीं तुलना केली, ह्मणजे सर्व पृथ्वी कसपटासारखी! विश्वाच्या नकाशांत सूर्याला बिंदूएवढें स्थान मिळण्याची मारामार, मग पृथ्वीला कोण विचारतो! पृथ्वीला जर एवढें लघुत्व येतें, तर आमच्या देशाची दुर्दशा केवळ कल्पनेनेंच जाणली पाहिजे! यावरून तात्पर्य इतकेंच घ्यावयाचें कीं, जों जों ज्ञान वाढत जातें, तों तों आपली मोठेपणाची कल्पना बदलते. प्रथम ज्यास आपण मोठें मानीत होतों, त्याचें आतां अस्तित्वही राहण्याचें कठीण पडतें. मग मी मोठा, माझा देश मोठा, माझ्या चालीरीती चांगल्या, या वृत्ति कोठून राहतील! '**वसुधैव कुटुम्बकम्**' अशी वृत्ति होऊन जावयाची, व ज्या देशांत जें चांगलें आढळेल, तें चांगलें ह्मणून त्याचा स्वीकार करण्याकडे मनाची प्रवृत्ति व्हावयाची!

२ हीच गोष्ट 'नशीब व उद्योग' या जोडीसही लागू आहे. जेवढी जेवढी अज्ञानाची व्याप्ति अधिक, तेवढें तेवढें नशीबाचें महत्त्व अधिक. जेवढा जेवढा ज्ञानाचा प्रसार जास्त, तेवढें तेवढें उद्योगाचें प्राबल्य जास्त. अज्ञानाच्या नाशाबरोबर अति देवभोळेपणा, स्वप्नांवरील विश्वास, शकुनांची भीति, वगैरे गोष्टी जशा आपोआप कमी होत जातात, तसा नशीबावरील विश्वासही कमी

कमी होत जातो. अज्ञानी मनुष्य ' राकआईल ' (खडकांतील तेल) घातक आहे ह्मणून त्याचा संग्रह करण्यास भितो, ज्ञानी मनुष्य तें बिनधोक ठेवण्याचा प्रयत्न करतो; व त्याचा उपयोग कसा करून घेतां येईल हें विचार करून ठरवितो. अज्ञानी मनुष्य ' नशीब ' ' नशीब ' ह्मणून स्वस्थ बसतो, व नशीबाचे परिणाम भोगतो, उद्योगी मनुष्य नशीबास आपल्या ताब्यांत आणण्याचा प्रयत्न करतो, व आपलें नशीब चांगलें बनवतो.

३ अज्ञानी मनुष्य, वाटेंत पर्वत आडवा आला, ह्मणजे पलीकडे जाण्याचें आपल्या नशीबीं नाहीं, असें ह्मणून स्वस्थ बसतो. ज्याला थोडासा ज्ञानाचा संस्कार झाला आहे, तो प्रवासाची चांगली तयारी करून; हळू हळू पर्वताच्या पलीकडे जातो. विशेषज्ञानी, पर्वताला बोगदा पाडून जवळची वाट काढतो. त्यापेक्षां जो ज्ञानानें श्रेष्ठ असतो, तो तर आगगाडी तयार करून, सगळेच चालण्याचे श्रम वांचवतो! यावरून अज्ञान्याला जेवढें नशीबाचें महत्त्व वाटतें, तेवढें ज्ञान्याला वाटत नाहीं, हें उघड आहे; व जों जों ज्ञान अधिक, तों तों उद्योगाचें प्राबल्य अधिक, हेंही खरें आहे; असें लक्षांत येईल.

४ एका उनाड पोराचा '**कालिदास** कवि' झाला, किंवा एका हलक्या स्थितींतील मनुष्याचा–प्रसिद्ध–' **बिरबल** ' झाला; ह्या उदाहरणांनीं आमच्या मनांत ज्ञानाचा थोडथोडा उजेड पडतो, व नशीबावरील भरंवसा डळमळूं लागतो; परंतु याच्यापुढें थोडीशी चाल केली, इंग्लंड व **अमेरिका** या खंडांकडे दृष्टि फेंकली,

आणि त्यांतील धुरंधर पुरुषांचे अचाट उद्योग मनांत आणले, ह्मणजे जो ज्ञानाचा झोत आमच्या मनांत उत्पन्न होतो, त्याच्यापुढें बिचाऱ्या नशीबाचें देहावसान होण्याची वेळ येते ! **तेम्स**नदीच्या खालून पूल बांधला, व **सुएझ**ची संयोगीभूमि नाहींशी करून, त्या ठिकाणीं **सुएझ**चा कालवा तयार केला; हीं कृत्यें आणि **विश्वामित्रा**ची प्रतिसृष्टि यांत काय अंतर आहे ! वाफेच्या अद्भुत शक्तीनें गलबतें चालूं लागलीं; वीज दिवे लावूं लागली व बातमी पोंचवूं लागली; यांत व **रावणा**चें पुराणांत वर्णिलेलें ऐश्वर्य यांत, काय फरक आहे ! **बेंजामिन् फ्रांकलिन** अगदीं गरीबाचा मुलगा असून, स्वतांच्या उद्योगानें लक्षाधिपति बनला; **गारफील्ड** साधारण स्थितीपासून वाढून, **उत्तर अमेरिकें**तील प्रजासत्ताकराज्याचा अध्यक्ष झाला; अडखळणारा **डिमास्थिनस**, **ग्रीस** देशांत प्रसिद्ध वक्ता झाला; आंधळा **मिल्टन**, प्रसिद्ध कवि ह्मणून वाखाणला गेला; मंदबुद्धि **होगर्थ**, प्रसिद्ध चित्रकार व खोदकाम करणारा झाला; इत्यादि गोष्टींचें ज्ञान झाल्यावर, नशीबाला कोनाकोंपऱ्यांत शिरण्याखेरीज काय इलाज आहे ! **शिवाजी, पहिला बाजीराव, नेपोलियन,** (**शिकंदर**बादशहा,) वगैरे पुरुष, ज्यांना विश्रांति कशी ती पळभर माहीत नव्हती, व ज्यांना अशक्य कांहीं वाटतच नव्हतें, त्यांच्याजवळ नशीबाची किंमत कितीशी होती ! तात्पर्य हें कीं, अशा विभूतींचें आचरण पाहून आमच्या मनांत ज्ञानाचा उजेड पडल्यावर, नशीबाची थोरवी आमच्यापुढें कितीशी टिकणार !

९ 'असेल माझा हरी तर देईल बाजेवरी'

'बलीयसी केवलमीश्वरेच्छा' (केवळ ईश्वराची इच्छा श्रेष्ठ) **'भवितव्यता बलीयसी'** (नशीब श्रेष्ठ) **'विधिरहोबलवानिति मे मतिः'** (अहो नशीब श्रेष्ठ असें मला वाटतें) **'यत्पूर्वं विधिना ललाटलिखितं तन्मार्जितुं कः क्षमः'** (जें पूर्वीं ब्रह्मदेवानें कपाळीं लिहिलें तें फिरवण्याला कोण समर्थ आहे!) इत्यादि वाक्यांची, अज्ञानाच्या काळांत जेवढी महती असेल, त्यापेक्षां **'उद्योग्याचे घरीं रिद्धिसिद्धि पाणी भरी' 'उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः'** (उद्योग करणाऱ्या पुरुषाला लक्ष्मी माळ घालिते) **'उद्योगिनः करालंबं करोति कमलालया'** (लक्ष्मी उद्योग्याला हात देते) **'दैवं प्रधानमिति कापुरुषा वदन्ति'** (दैव श्रेष्ठ असें नीच पुरुष ह्मणतात) 'Every man is the architect of his own fortune' (प्रत्येक मनुष्य आपल्या नशीबाचा कारागीर आहे.) इत्यादि वाक्यांची महती, ज्ञानवृद्धीच्या काळांत अधिक असावयाची.

६ बीज आधीं कीं वृक्ष आधीं, हा वाद जसा कधींही मिटावयाचा नाहीं, त्यांतलाच कांहींसा प्रकार 'नशीब थोर कीं उद्योग थोर' या वादाविषयीं आहे. बीज लावल्याशिवाय वृक्ष होत नाहीं, व वृक्ष झाल्याशिवाय बीज मिळावयाचें नाहीं. तेव्हां बीज आधीं कीं वृक्ष आधीं! आधीं काय हें सांगतां येत नाहीं. त्यांचा अन्योन्याश्रय मात्र दिसतो. तसेंच नशीब थोर कीं उद्योग थोर! नशीब थोर ह्मणावें तर त्याचें उद्योगाशिवाय कांहीं चालत नाहीं. बरें उद्योग थोर ह्मणावा, तर

नशीब अनुकूळ झाल्याशिवाय तो फलद्रूप होत नाहीं. तेव्हां थोर कोण! वृक्ष व बीज यांचा अन्योन्याश्रय दिसतो, तसाच यांचाही दिसतो. उद्योग श्रेष्ठ असें ह्मणून उद्योग करीत सुटावें, तर केव्हां केव्हां उद्योगाला फळ येत नाहीं; व केव्हां केव्हां तर आपण केलेला उद्योग आपल्याच नाशास कारण होतो. बरें दैवावर विश्वास ठेवून स्वस्थ बसावें, तर तें अनुकूळ होईपर्यंत दुसऱ्याच्या तोंडाकडे मात्र पहात बसावें लागतें! तें केवळ पंगू, त्याच्यानें काय होणार, त्याला सतत प्रयत्नाची मदत लागते!

७ आतां या वादाचा दुसऱ्या एका दृष्टीनें मात्र निकाल होतो, व उद्योगाचें श्रेष्ठत्व स्थापित होतें. उद्योगाला नशीबाची मदत नेहमीं लागत नाहीं. ह्मणजे उद्योगाचें फळ कांहीं तरी प्राप्त होतेंच. नशीब अनुकूळ असलें, तर तें द्विगुणित होतें, अनुकूळ नसलें, तर थोडें होतें. परंतु मुळींच प्रयत्न केला नाहीं, तर कांहींच प्राप्त व्हावयाचें नाहीं. उद्योगाला कांहीं तरी फल देण्याचें सामर्थ्य आहे, व तें सदोदित आहे. जो जमीन लावील, त्याला पीक मिळेल. नशीब अनुकूळ असेल, तर दुप्पट मिळेल; प्रतिकूळ असेल, तर कमी मिळेल; परंतु मिळेल. ह्मणजे उद्योग कांहीं वेळ तरी स्वतंत्रतेनें फल देईल. नशीबाचें तसें नाहीं. त्याला उद्योगाची मदत नित्य पाहिजे. त्याचें पाऊल उद्योगाशिवाय पुढें पडण्याचा संभव नाहीं. उद्योग करावयाचा नाहीं, केवळ नशीबावर भार ठेवून स्वस्थ बसावयाचें, असें जो मनांत आणील, त्याला नशीब अनुकूळ झाल्यावर कदाचित् मोठा

लाभ होईल; परंतु एरव्हीं कांहीं मिळावयाचें नाहीं. तेव्हां यावरून नशीबापेक्षां उद्योग श्रेष्ठ, असें सहज सिद्ध होतें. उद्योगावर विश्वास ठेवणारांस, जेव्हां त्यांचा उद्योग फसेल, किंवा विपरीत फल देणारा होईल, तेव्हां—मनाचें समाधान करण्याकरितां,—नशीबाची आठवण करावी लागेल; परंतु नशीबावर भरंवसा ठेवणारांस, पदोपदीं उद्योगाची कांस धरावी लागेल. **'असेल माझा हरी तर देईल बाजेवरी'** या वाक्याप्रमाणें बाजेवर जरी पंचपक्वान्नांचें ताट भरून आलें, तरी त्याचा उपयोग करावयाचा ह्मणजे हातांस, तोंडास व दांतांस, उद्योगाचे स्वाधीन केल्याशिवाय चालणार नाहीं. हातानें अन्न घेऊन तोंडांत घालावें, दांतांनीं तें चावावें व घशानें तें गिळावें, तेव्हां तें पोटांत जाईल; व त्याचें पचन होऊन त्याचा रस होईल, तेव्हां तो शरीरपोषणाच्या उपयोगीं पडेल. अन्नाचें पचन होण्यासही शरीरांतील यंत्रांचा अव्याहत व बिनचूक व्यापार चालला पाहिजे, ह्मणजे त्यांच्याकडून उद्योग घडला पाहिजे! नुसतें अन्नाकडे पहात बसल्यानें, किंवा नशीबाचें स्मरण केल्यानें शरीरपोषणाचें कार्य उरकणार नाहीं.

८ सृष्टींतल्या कोणत्याही व्यवहाराकडे नजर फेंकली, तरी उद्योगाचें अगत्य नजरेस येईल; उद्योगाचें महत्व मनांत ठसेल; व उद्योग केला पाहिजे हें तत्व स्थापन होईल. पशुपक्ष्यांकरितां आयते पदार्थ ईश्वरानें उत्पन्न करून ठेविले आहेत, तरी त्यांसही उद्योग करावा लागतो. डोंगरांवर व मैदानांवर गवत उत्पन्न केलें आहे, तरी त्या ठिकाणांपर्यंत त्यांस गेलें पाहिजे, व गवत

तोडून खाल्लें पाहिजे. जागोजाग विपुल पाणी उत्पन्न केलें आहे, तरी तेथें जाऊन तें प्यालें पाहिजे. जगतांतील घडामोड ही उद्योगाच्या तत्वावर चालली आहे, नशीबावर चालली नाहीं. पाऊस पडण्याचा नियमित काळ नसता, तर शेतकी चालली नसती. जमीन केव्हां नाहींशी होईल, किंवा डोंगर केव्हां खचेल, याचा नियम नसता, तर सृष्टीच्या व्यवहारास अडचण उत्पन्न झाली असती. पाणी नासूं नये ह्मणून जी परमेश्वरानें योजना केली आहे, त्यावरून हेंच तत्व स्थापन होतें. उन्हाळ्यांत उष्णतेनें पाण्याची वाफ होते, ती आकाशांत जाते तेव्हां त्यांतला खारटपणा तळाशीं रहातो, व तें पाणी गोडें होऊन त्याचे मेघ बनून पर्जन्यरूपानें जमीनीवर पडतें. पाणी स्वच्छ व्हावें, ह्मणून त्याच्यामागें केवढा उद्योग लावून दिला आहे पहा!

९ आपल्या शरीराकडे पाहिलें, तरी हेंच तत्व आपल्या मनांत ठसेल. परमेश्वरानें आपल्यास हात, पाय इत्यादि अवयव दिले आहेत, त्यांस आपण कामास लावलें, तर ते अधिक उपयोगी व अधिक बळकट होतात;—केव्हां केव्हां तर त्यांचे पराक्रम पाहून आपण थक्क होतों,—परंतु त्यांना जर आपण रिकामें ठेवलें, तर ते—गंजलेल्या कुलुपाप्रमाणें—निश्शक्त व निरुपयोगी होतात. बैराग्यानें जर आपला हात वरतीं उचलून धरला, व तो कांहीं दिवस तसाच राहूं दिला, तर तो वाळून जातो व निरुपयोगी बनतो; परंतु त्याच हातांत घण देऊन जर त्याला कामाला लावलें, तर दिवसेंदिवस त्यांत अधिक शक्ति येते; व तो मोठमोठीं कामें करण्यास समर्थ होतो. हमाल नेहमीं

पाठीवर ओझीं वाहतात, त्यामुळें हातांनीं हालण्यास कठीण अशीं ओझीं ते पाठीवर सहज वाहून नेतात. लमाण नेहमीं मणगटांवर गोण्या उचलतात, त्यांचीं मणगटें टणक व मजबूद होतात; व बैलांच्या पाठीवर टाकावयाच्या गोण्या ते मणगटानें सहज उचलून टाकतात. एखादा मनुष्य खांबाशीं टकरा घेऊन आपलें कपाळ तयार करतो; त्याच्या डोक्याचा तडाका आपल्या डोक्यास लोखंडासारखा प्रहार करितो, व तो आपल्यास सोसत देखील नाहीं. कुस्ती करणारे, आपले अवयव लोखंडासारखे तयार करतात, हा कशाचा प्रभाव! सोमलासारखीं विषें मनुष्याच्या पचनीं कशानें पडतात! डोकें पाहिलें तर तें वीतभरही रुंद नसतें, परंतु त्यांत सगळें जग व जगाचा इतिहास उद्योगानें सांठवितां येतो. कोणास चार शब्दांचीही स्मृति रहात नाहीं, परंतु कित्येकांस सर्व आयुष्यांत घडलेल्या गोष्टी खडान्‌खडा माहीत असतात!

१० परमेश्वरानें अनेक पदार्थ सृष्टींत उत्पन्न करून ठेविले आहेत, परंतु ते आपल्यास उद्योग केल्याशिवाय मिळूं नयेत, अशी त्याची इच्छा दिसते. त्यानें जमिनींत शेतें पिकवण्याची शक्ति ठेविली आहे, परंतु लावणीकापणी केल्याशिवाय पीक मिळावयाचें नाहीं. समुद्राच्या पोटांत मोत्यें आहेत, परंतु तीं बुड्या मारून काढल्याशिवाय मिळावयाचीं नाहींत. जमीनीच्या पोटांत रत्नांच्या खाणी आहेत, परंतु उद्योग करून त्या काढल्याशिवाय त्यांचा उपयोग व्हावयाचा नाहीं. वाफ, पाणी, वारा, वीज, इत्यादि पदार्थांत अद्भुत शक्ति ठेविल्या आहेत; परंतु

त्यांचा उपयोग करून कसा घ्यावा, हें उद्योग करून समजून घेतल्याशिवाय बिलकुल समजलें नसतें. ह्यावरून उद्योगाचें महत्त्व सहज सिद्ध होतें व तें अगदीं खरें आहे.

११ नशीबावर भरंवसा ठेवणारे लोकांचें पाऊल पुढें पडावयाचें नाहीं. ते उद्योगाचे भक्त झाल्याशिवाय त्यांस चांगली दशा यावयाची नाहीं, संपत्ति मिळावयाची नाहीं, स्वतंत्रता प्राप्त व्हावयाची नाहीं, व खरें सुख मिळावयाचें नाहीं; याकरितां नशीबावर अवलंबून न राहतां उद्योगाची कांस धरावी हेंच सर्वांस अगत्याचें आहे.

१२ **'खिळ्यासाठीं नाल गेला, नालासाठीं घोडा गेला, घोड्यासाठीं स्वार गेला, इतका अनर्थ खिळ्यानें झाला'** अशी आपल्या भाषेंत एक ह्मण आहे. 'खिळा' गेल्यानें जी अनर्थपरंपरा उत्पन्न झाली, तीच उद्योगाच्या अभावानें उत्पन्न होते. लोकांनीं उद्योग केला नाहीं, ह्मणजे त्यांचा व्यापार लयास जातो, व्यापार लयास गेला, ह्मणजे अकिंचनत्व पदरांत येतें; व अकिंचनत्वापासून पारतंत्र्य गळ्यांत पडतें! याकरितां सर्वांचें मूळ जो उद्योगाचा अभाव, त्याचा सर्वांनीं नाश करावा; व उद्योगाचा स्वीकार करून, ही अनर्थपरंपरा चुकवावी; हेंच सर्वांस श्रेयस्कर होय.

१३ नशीबाचा आपल्यास जितका उपयोग आहे, त्यापेक्षां उद्योगाचा अधिक आहे, याकरितां आपण उद्योगशील व्हावें. एखाद्या महासागरांत तारूं हाकारावयाचें, तसेंच या संसाररूपी महासागरांत मनुष्यरूपी तारूं हाकारिलें आहे. ज्याप्रमाणें महासागरांत कोठें खडक असतात; व कोठें भयंकर मासे त्याला फोडावयास व बुडवावयास तयार असतात;

त्याप्रमाणें संसाररूपी महासागरांतही अनेक संकटें, अडचणी व अकल्पित प्रसंग येणारे असतात. महासागरांतून तारूं हाकारावयास आपल्यास जो वाटाड्या पहावयाचा, तो सर्व महासागराचा नकाशा जाणणारा, त्यांतील संकटांतून बचावून नेणारा, व आपलें ऐकणारा पाहिजे. तसेंच आपल्यास संसाररूपी महासागरांतून बचावून नेणारा जो वाटाड्या पहावयाचा, तोही अशाच गुणांनीं युक्त असला पाहिजे. तसा नसेल, तर आपलें तारूं केव्हांच भडकून खडकावर आपटून फुटून जाईल! आपल्यापुढें दोन वाटाड्ये मार्ग दाखविण्याकरितां तयार आहेत. प्रत्येकाजवळ मोठमोठ्या पंडितांचीं शिफारसपत्रें आहेत. त्यांचीं नांवेंही जगाच्या इतिहासांत गाजलेलींच आहेत. **एकाचें नांव नशीब**, व **दुसऱ्याचें नांव उद्योग**. यांपैकीं नशीब हा वाटाड्या पांचव्या पुस्तकांत सांगितलेल्या **मारुत** राक्षसासारखा लहरी आहे. तो आपलें बिलकुल ऐकावयाचा नाहीं. त्याची लहर लागेल, तेव्हां तो कामाचे ढीग घालील; व लहर फिरेल, त्यावेळेस धन्याचें नुकसानही करील! तो धन्यास न विचारतां येईल, व पुसल्याशिवाय निघून जाईल! उद्योग हा जलौघासारखा आहे. तो काम सावकाश करील, परंतु चांगलें करील. तो आपल्या धन्यावर सहसा उठणार नाहीं. त्याची असर्यादा करणार नाहीं, किंवा अवज्ञा करणार नाहीं. '**ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम्**' या भगवदुक्तीचें तो अक्षरशः अवलंबन करणारा आहे. तेव्हां या दोन वाटाड्यांपैकीं आपण कोणता वाटाड्या पसंत करावा? मला वाटतें सावकाश

काम करणारा कां होईना, परंतु धन्याचा भाग्योदय चिंतणारा, व त्याजवर सहसा न उठणारा बरा; तोच पसंत करावा. शिवाय हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे, कीं आपण उद्योगाचे भक्त झालों, म्हणजे त्यांतच आपला फायदा आहे. कारण आपण उद्योगाचे भक्त असल्यामुळें, ज्यावेळेस नशीब आपल्यास अनुकूळ होईल त्यावेळेस आपलें तारूं सहजच दुप्पट जोरानें चालेल. बरें ज्यावेळेस नशीब आपल्यावर रुसेल, त्यावेळेस आपलें तारूं जागच्या जाग्यावर खुंटणार नाहीं, किंवा फारकरून खडकावर आपटून त्याचे तुकडे तुकडेही होणार नाहींत. कारण उद्योग आमचा जिवलग मित्र असल्यामुळें, तो विपत्कालीं दुप्पट जोरानें आमच्या तारवास हातभार लावील; त्यामुळें नशीबाशीं झगडतांना आमचा केवळ चुराडाच होणार नाहीं! नशीबाच्या हवालीं जर आह्मीं आपलें तारूं केलें, तर–त्याची लहर लागेल तेव्हां–तें दुप्पट वेगानें धांवत जाईल हें खरें, पण जर का त्याची लहर फिरली, तर तें तारूं खडकावर आपटून फुटून जाईल, नाहीं तर बुडून महासागराच्या तळाशीं जाऊन बसेल, याचा कोणी नियम सांगावा! तेव्हां अशा लहरी वाटाड्याच्या 'लहरी' स्वभावावर विश्वास ठेवण्यापेक्षां, उद्योगासारख्या सरळ स्वभावाच्या वाटाड्यावर विश्वास ठेवणें चांगलें, हें उघड आहे.

१४ नशीबानें घडणाऱ्या गोष्टी घडतातच, मग त्यांची वाट पहात बसण्यांत हांशील काय? त्या जेव्हां घडावयाच्या असतील तेव्हां घडतील. आपल्या मनासारख्या गोष्टी घडवण्याचें सामर्थ्य नशीबांत नाहीं, तें

उद्योगांत आहे; ह्मणून आपण उद्योगावर भरंवसा ठेवणें चांगलें. आपण कोणतेंही काम—करूं—असा निश्चय केल्याशिवाय तें होत नाहीं; याकरितां तें उमेदीनें करणें हें आपलें कर्तव्य आहे. त्याला अडचणी येणार नाहींत असें नाहीं. परंतु येईनात, त्याचा आपण विचार करीत बसूं नये, किंवा त्यांना दबकूं नये; त्यांतून पार पडण्याचा शक्त्यनुसार प्रयत्न करावा. अडचणींचा विचार करीत बसल्यास, किंवा नशीबाची वाट पहात बसल्यास, आलेली संधि दवडल्याचा मात्र आपल्यास पश्चात्ताप होईल. याकरितां उद्योगाकडे श्रेष्ठत्व देऊन,—नशीबाची वाट न पाहतां,–संधि आली कीं पुढें घुसण्याचा क्रम आपण ठेविला पाहिजे. हा सामान्य विचार झाला. आतां नशीब ह्मणजे काय या प्रश्नाचा विचार करूं.

२ नशीब ह्मणजे काय ?

१ एकसारख्या बुद्धीचे, एकसारखा श्रम करणारे, अनेक लोक एकाच कार्याच्या सिद्धीकरितां झटत असतात. तरी साऱ्यांसच सिद्धि प्राप्त होते, असें नाहीं; कित्येकांस मात्र ती प्राप्त होते. बरें, जेवढ्यांस ती प्राप्त होते, तेवढ्यांस सुद्धां सारखी फलद्रूप होत नाहीं. एकास जेवढा मान मिळतो, तेवढा दुसऱ्यास मिळत नाहीं. एकाची जेवढी प्रतिष्ठा होते, तेवढी दुसऱ्याची होत नाहीं. एकास जेवढें द्रव्य मिळतें, तेवढें दुसऱ्यास मिळत नाहीं. एखादे वेळेस तर एकाचा मोठा जयघोष होतो, व दुसऱ्यास कोणी सुद्धां विचारीत नाहीं ! तेव्हां असें होण्याचें कारण नशीब असें लोक ह्मणतात. आतां जगांत

मूर्ति तेवढ्या प्रकृति, हें जर खरें आहे, तर एकाचें साम्य दुसऱ्याशीं सर्वांशीं होणें अशक्यच ! तेव्हां एकसारख्या बुद्धीचे, एकसारखे श्रम करणारे, जरी असले, तरी लोकांत त्यांची सारखीच मान्यता होईल, असें ह्मणतां येत नाहीं. दोघांच्यांत जरी बरेच सद्गुण असले, तरी व्यवहारांत लोकांचीं मनें ओढून घेणारे गुण ज्याच्यामध्यें असतील, त्याची लोकांत अधिक प्रतिष्ठा होईल; व त्याचा जयघोष होईल. तेव्हां दुसऱ्यानें नशीबाचा जयघोष करण्यापेक्षां लोकांत शेजाऱ्याची चहा कां आहे, त्याच्यांत आपल्यापेक्षां अधिक गुण कोणता आहे, तो आपल्याला साध्य होईल किंवा नाहीं, याचा विचार करावा; व तो कमतरपणा उद्योगानें नाहींसा करण्याचा प्रयत्न करावा; ह्मणजे आपलीही लोकांत प्रतिष्ठा होईल, व केव्हां तरी लोक आपला जयघोष करतील, हें त्यानें लक्षांत ठेवावें.

२ फलप्राप्ति व्हावी ह्मणून सर्वजण उद्योग करतात, तरी साऱ्यांस सारखी फलप्राप्ति होत नाहीं. केव्हां केव्हां तर उद्योग अगदीं फुकट जातो. बरें प्रयत्न करण्यांत त्या व्यक्तीची चूक आहे, असेंही परिणाम होईपर्यंत कळत नाहीं. अशा वेळेस ह्या गोष्टीला नशीब असें लोक ह्मणतात. चार व्यापारी धान्याचीं तारवें भरून व्यापाराकरितां बाहेरदेशीं पाठवितात. एकास अनुकूळ वारा लागल्यामुळें त्याचें तारूं प्रथम पोंचतें. त्याचें प्रथम पोंचल्यामुळें त्यास—धान्याची कमताई असल्यामुळें—दर चांगला येतो. दुसऱ्यानें ज्याचें पोंचतें, त्याला—धान्याची विपुलता झाल्यामुळें—दर कमी

येतो. तिसऱ्याचें उशीरां पोंचल्यामुळें, त्यास गिऱ्हाईकच मिळत नाहीं; व चौथ्याच्या वेळीं समुद्रांत अकल्पित वादळ झाल्यामुळें, त्याचें तारूं धान्यासकट बुडून जाऊन तळाला बसतें! हें पाहून याचें कारण कळत नाहींसें झालें, ह्मणजे लोक त्यास नशीब असें ह्मणतात. आतां यांतही प्रत्येक ठिकाणीं विचाराला थोडीशी संधि सांपडेल; तरी होणारें नुकसान नेहमीं टाळतां येणार नाहीं. प्रयत्नवादी यत्न चुकला ह्मणून नुकसान झालें, असें ह्मणतील, व दैववादी दुर्दैवानें नुकसान झालें, असें ह्मणतील; इतकेंच. तरी सुद्धां पहिल्या प्रकारच्या समजुतीपासून थोडासा फायदा आहे. दैववादी दैवावर विश्वास ठेवून स्वस्थ राहील, यामुळें त्याच्यांत अनुभवाचें शहाणपण येणार नाहीं. प्रयत्नवादी '**पुढल्यास ठेंच मागला शहाणा**' या ह्मणीवर लक्ष ठेवून, आपली चूक काय झाली, ती शोधून काढील; व पुढल्या वेळीं तशी चूक न होऊं देण्याविषयीं खबरदारी बाळगील. यामुळें त्यास फिरून पश्चात्ताप किंवा दुःख करण्याची वेळ येणार नाहीं. '**विकतें शहाणपण चांगलें**' ह्मणजे स्वतः अनुभवानें आलेलें शहाणपण चांगलें. पण तें शहाणपण अद्दल घडल्याशिवाय येत नाहीं. तेव्हां आपलें नुकसान झालें तरी दैवाचा घोष करीत न बसतां, त्या नुकसानापासून अनुभवाचें शहाणपण शिकत जावें.

३ विहिरीकरितां सुरुंग लावावा, त्यानें घराचा पाया खचावा, किंवा भिंत पडावी; घराजवळील झाड घरावर पडेल ह्मणून तोडावयास जावें, तों त्याच्या खालीं आपणच सांपडून जायबंदी व्हावें, किंवा मरावें; बंदुकीनें घा-

तक प्राण्यास मारावयास जावें, तों नेम चुकून त्यानें आपलेच डोळे फुटावे, किंवा जीव जावा; अशा गोष्टी झाल्या,—आपण आपल्या हिताकरितां प्रयत्न करीत असतां आपलें अहित झालें,—ह्मणजे त्यास नशीब असें लोक ह्मणतात. आतां विचारदृष्टीनें पाहिल्यास येथें ही सवड आहे, ती अशी. सृष्टि हें—उंसाच्या चरकासारखें—एक यंत्र आहे. यंत्रांत कोणाचा हात सांपडो, किंवा लांकूड सांपडो; त्यांत जें सांपडेल, त्याचा तें चुराडा करणार. हातपाय सांपडला तर क्षमा करावी, व लांकूड सांपडलें तर त्याचा चुराडा करावा, हें तत्व त्या यंत्रास ठाऊक नाहीं. तसेंच सृष्टीचें काम आहे. सृष्टींतील नियमांकडे तुह्मीं लक्ष दिलें नाहीं, कीं तुमच्या चुकीचें फळ तुह्मांस मिळणार. ‘मला नियम समजला नाहीं’ अशी कुरकुर तिच्याजवळ चालावयाची नाहीं. तुह्मी थोडे जरी चुकलां, तरी त्या चुकीचें जें फळ मिळणें असेल, तें तुह्मांस मिळेल. बंदुकीस धक्का लागला, कीं ती उडणार; मग तिच्या तडाक्यांत जनावर सांपडो, किंवा तिचा मालक सांपडो! सुरुंग उडाला कीं तो कशाला तरी फोडणार; मग त्याच्या तडाक्यांत विहिरीचा खडक सांपडो, किंवा घराचा पाया सांपडो! झाड तोडलें कीं, तें पडणार; मग त्याच्या खालीं कोण सांपडलें, याचा विचार तें करणार नाहीं. विजेचा लोळ आला ह्मणजे तो घर, झाड, मनुष्य, जें सांपडेल त्याचा नाश करणार! पाण्याचा लोंढा आला, कीं तो पुढें येणाऱ्या सर्व वस्तूंस वाहून नेणार! परंतु याच शक्तींचा योग्य उपयोग आपण करून घेतल्यास होण्यासारखा

असतो. त्यांच्यापासून कोणता अपाय होण्याचा संभव आहे, याचा विचार करून, योग्य ती तजवीज केली, ह्मणजे झालें. सुरुंग उडवल्यास भिंतीला किंवा पायाला इजा होईल कीं काय, बंदुकीचा रोंख पाहिजे तसा आहे किंवा नाहीं,—कीं धांदलींत तो भलतीकडेच झाला आहे,—इत्यादि गोष्टींचा नीट विचार केला पाहिजे. तिळेल तेल घातक नाहीं, ह्मणून तें आपण जसें वापरतों, तसें 'राकआईल' वापरून चालणार नाहीं. परंतु त्याचा उपयोग करून घ्यावयाचा असला, तर योग्य ती तजवीज केली पाहिजे. ती न केली, तर अपघात झाल्याशिवाय रहाणार नाहीं. विजेच्या शक्तीचाही योग्य योजनेनें उपयोग करून घेतां येतो. पाण्याच्या लोंढ्यापासून कामें घेतां येतात. वाफेचे उपयोग तर आपण नेहमीं पहातच आहों. यावरून **'योजक-स्तत्र दुर्लभः'** याची सत्यता ध्यानांत येईल, व नशीबास दोष देण्यास फारशी जागा रहाणार नाहीं.

४ एकानें उन्हातान्हांतून द्रव्य मिळवावें, त्याचा कवडीचाही उपभोग घेऊं नये; परंतु तें द्रव्य त्या धनवानाच्या मरणानें, किंवा त्याच्या पोरांबाळांच्या मरणानें,—ज्यास तें मिळण्याचा काडीइतकाही संबंध नाहीं, अशा—भलत्याच मनुष्याच्या हातांत वारस ह्मणून आयतेंच पडावें; व मग त्यानें त्या संचित द्रव्याचा पाहिजे तसा फन्ना उडवावा; असें झालें, ह्मणजे या आगापिछा नसतां घडलेल्या प्रसंगास लोक 'नशीब' असें ह्मणतात.

५ एखाद्या मनुष्यास संकटानें ग्रासलें आहे, असें

पाहून दुसऱ्यानें त्यास मदत करण्याकरितां प्रयत्न करावा, परंतु तो प्रयत्न त्यास फलद्रूप न होतां, त्याच्या योगानें तिसऱ्याचेंच कार्य व्हावें; किंवा मदत करणाराचा तोटा व्हावा; असें झालें, ह्मणजे लोक नशीबाची कल्पना करितात. वाटेंत पैशाची पिशवी पडलेली असावी, पण ती आपल्यास सांपडावयाची नसली, ह्मणजे—आंधळा कसा चालतो—हें पाहण्याची आपल्यास इच्छा व्हावी, व त्या अवकाशांत ती पिशवी दुसऱ्यास मिळावी, असें झालें, ह्मणजे लोक त्यास 'नशीब' असें ह्मणतात.

६ ह्या उदाहरणांवरून नशीब ह्मणजे काय, हें बहुतकरून ध्यानांत येईल. जें अकल्पित घडतें, ज्याचें कारण कळत नाहीं, आपण करावयास जातों एक व होतें भलतेंच, किंवा जें अटकळीहून भलत्याच प्रकारानें घडून येतें, त्यास लोक 'नशीब' असें ह्मणतात.

नशीब हा आरबी भाषेंतील शब्द आहे. आपल्या भाषेंत नशीबास अनेक शब्द आहेत. त्यांच्या अर्थांतही थोडें थोडें अंतर आहे. याकरितां नशीब हा आरबी भाषेंतील शब्द निबंधांत दिला असावा. नशीबाबद्दल थोडासा विचार वर झाला. आतां नशीबाचे वाचक, परंतु थोडथोड्या वेगळ्या अर्थानें येणारे, जे शब्द आपल्या भाषेंत आहेत, त्यांचा थोडासा विचार करूं.

३ पर्यायवाचक शब्द.

१ दैव ह्मणजे नशीब. दैव हा शब्द देव या शब्दापासून साधला असावा, व त्याचा अर्थ देवाची इच्छा असा असावा, असें वाटतें. दैव हा शब्द ज्या ठिकाणीं

योजावयाचा, त्या ठिकाणीं देवाची इच्छा, ईश्वराची इच्छा, असे प्रयोग वारंवार येतात. (**बलीयसी केवलमीश्वरेच्छा**) हा श्लोक दैव या सदराखालीं लिहिलेला आढळतो. आतां दैव याचा अर्थ ईश्वरी इच्छा असा असेल, तर तो पांगळया नशीबापेक्षां पुष्कळ बरा. परमेश्वर आहे, अशीच बहुतेक लोकांची कल्पना आहे, व ती सर्वांचें हित करणारी आहे. तो सर्वशक्तिमान् व सर्वसाक्षी आहे, त्याच्या हुकुमावांचून काडीही हालावयाची नाहीं, हें सर्वांस कबूल आहे; तेव्हां ईश्वरी इच्छा सर्वांस मान्य असलीच पाहिजे. परंतु ही ईश्वरी इच्छा ही ज्ञानाच्या पायरीप्रमाणें कमजास्त वाटणारी आहे.

२ अज्ञानी व ज्ञानी दोघे ईश्वराला भजणारे असतात, परंतु दोघांच्या भक्तींत मात्र अंतर असतें; यामुळें दोघांची ईश्वराविषयीं कल्पना निराळी असते. दैव ह्मणजे देवाची इच्छा. तेव्हां ती इच्छाही एकाच्या दृष्टीनें वेगळी, व दुसऱ्याच्या दृष्टीनें वेगळी. अज्ञानी मनुष्य पदोपदीं दैवाची कल्पना करतो, व ज्ञानी प्रयत्न करून थकल्यावर दैवाची कल्पना करतो, नाहीं तर करीतही नाहीं. एखादें संकट आलें असतां,—काय प्रसंग येईल कोण जाणें,—असें ह्मणून, अज्ञानी भिऊन जातो; परंतु ज्ञानी मनुष्य भीत नाहीं, तो ईश्वरावर भरंवसा ठेवून संकटांतून निभावण्याचा प्रयत्न करतो; अथवा संकटाचा परिणाम सोसण्यास तयार होतो. ईश्वराविषयीं जेवढी प्रगल्भ कल्पना असावयास पाहिजे, तेवढी अज्ञानी मनुष्याच्या मनांत असत नाहीं; यामुळें तो भलत्याच ठिकाणीं दैव किंवा ईश्वरी इच्छा समजतो;

भलतेंच कृत्य करून ईश्वरास प्रसन्न करून घेण्यास पहातो; व भलत्याच प्रयत्नानें आपल्या नशीबांत बदल पाडण्याचा यत्न करतो. अंमळ दुखणें आलें, कीं तो दैवास दोष देऊं लागतो, व देव खेळविण्याचा विचार करतो! परंतु सर्व जग व्यापून उरणारा सर्वशक्तिमान् ईश्वर, यःकश्चित् मनुष्याच्या आंगांत पाहिजे तेव्हां कसा येईल, व भक्ताची इच्छा तृप्त कशी करील, कोंबड्याबकऱ्यांवर तृप्त कसा होईल, इत्यादि विचार त्याच्या मनांतही येत नाहींत! एखाद्या कामांत विचाराची पाळी आली, कीं तो देवास कौल लावण्यास तयार होतो! परंतु सर्वशक्तिमान् परमेश्वराचें ध्यान करणें कठीण, ह्मणून जी मूर्ति आपण स्थापिली, त्या मूर्तीनें—काम करावें कीं न करावें, याचा—कौल द्यावा कसा, याविषयीं विचार त्याच्या मनांत येत नाहीं. कांहीं चमत्कारिक गोष्ट दृष्टीस पडली, ह्मणजे तो तिला दैविक चमत्कार समजतो, तिच्या कारणाचा विचार करीत नाहीं, व भोळेपणानें तेथेंच रममाण होतो. परमेश्वरानें सृष्टिरचना करून तींत अनेक चमत्कार उत्पन्न करून ठेविले आहेत, हें खरें; परंतु त्या चमत्कारांना दिपून आपण मुख्य ईश्वरास विसरतां कामा नये. त्यांतील रहस्य समजून घेण्याचा प्रयत्न करून, मुख्य ईश्वराकडे त्यांचें कर्तृत्व आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. उन्हाळ्याचीं कुंडें, अकल्पित उत्पन्न होणारे झरे, ज्वालामुखी, वगैरे चमत्कार अशा प्रकारचे होत. तसेंच जागोजाग दैवाची कल्पना करून, डबक्यांतल्या पाण्याप्रमाणें, आपल्या बुद्धीची मर्यादा आकुंचित करणें चांगलें नाहीं. महानदीप्रमाणें तिचा

प्रवाह एकसारखा चालावा, व तो स्वच्छ असावा, ह्मणून प्रयत्नवादी होऊन तिला एकसारखें चालन देत असलें पाहिजे. चांगलें जेवण मिळालें, ह्मणजे सुदैव, व वाईट मिळालें ह्मणजे दुर्दैव; असली विचारशक्ति उपयोगाची नाहीं. अशानें तो मनुष्य केवळ दैवमय बनून जातो. ज्ञानी मनुष्याचें असें नसतें. तो कारणांचा शोध करीत असतो. सृष्टिव्यापक ईश्वराविषयीं त्याची कल्पना दृढ झालेली असते, यामुळें तो दैवास फारसा बिलगून रहात नाहीं. सोसाट्याच्या वाऱ्याच्या समोर आपण जाऊं लागल्यास, आपला निभाव लागावयाचा नाहीं; हें तो जाणून असतो. तो आपली जाण्याची दिशा बदलतो, व वाऱ्याशीं झगडण्याचें सोडून त्याची शक्ति आपल्यास कांहींशी साह्यकारीच करून घेतो. यामुळें त्यास पदोपदीं दैव दिसत नाहीं. अगदीं लांब, उद्योग थकल्यावर, त्याची व दैवाची गांठ कधींकाळीं पडली तर पडते!

३ जन्मतः कित्येक प्राण्यांस सर्व इंद्रियें असतात, व कित्येकांस कांहीं कांहीं इंद्रियांची उणीव असते; तेव्हां हें असें कां असावें, असा प्रश्न शोधक मनुष्याच्या मनांत सहज उत्पन्न होतो. एक उपजतच राजपुत्र असल्यामुळें, वैभवसंपन्न होतो, व दुसरा गरीबाच्या पोटीं आल्यामुळें, विपद्ग्रस्त होतो, याचें कारण काय? कारणावांचून कार्य घडत नाहीं, असें आपण पहातों. याकरितां याच्या कारणाकडे शोधकाचें लक्ष सहज जातें. हें कारण '**प्राचीनकर्म**' असें आपल्या पुरातन शास्त्रकारांनीं ठरविलें आहे. '**प्राचीनकर्मबलबन्मुनयो वदन्ति.**'

(मुनि असें ह्मणतात कीं प्राचीनकर्म (पूर्वकर्म) बलवान् आहे.) **'जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्यच'** (जो जन्मला तो निश्चयानें मरावयाचा व जो मेला तो निश्चयानें जन्मास यावयाचा) या गीतेंतील भगवद्वाक्यावरून उपजलेला प्राणी मरावयाचा, व मेलेला उत्पन्न व्हावयाचा. तेव्हां एका जन्मांत जें पापपुण्य घडलें असेल, त्याची फलप्राप्ति सुखदुःखरूपानें दुसऱ्या जन्मीं व्हावयाची. ह्मणून उपजतांच जे विकलेंद्रिय होतात, ते मागल्या जन्माच्या पातकाच्या संबंधानें होतात. याकरितां नशीबाला 'प्राक्कर्म' किंवा 'कर्म' असें ह्मणतात. आतां हें कर्म मानल्यानें उपजतांच विकलेंद्रिय किंवा मंदबुद्धि किंवा संपूर्ण इंद्रियांनीं युक्त किंवा सुबुद्धि होण्याच्या शंकेचें समाधान झालें, हें खरें; परंतु पुढें सर्व आयुष्यांत जें फल मिळावयाचें तेंही प्राक्कर्मानेंच कीं काय, ही शंका राहिली. तर तेंही प्राक्कर्मानेंच. कारण **'बुद्धिः कर्मानुसारिणी'** (कर्माप्रमाणें बुद्धि होते) असें शास्त्रकारांचें मत आहे. ह्मणजे आपला प्रयत्न कांहीं नाहीं. आपल्याला प्रयत्न करावासा वाटणें, ह्मणजे यत्न करण्याची बुद्धि होणें, हेंही आपल्या प्राचीन कर्माच्या स्वाधीन आहे. आपल्या कर्माप्रमाणें आपल्यास बुद्धि होते.

४ आतां यावरही दुसऱ्या बाजूचा विचार आहेच. कुंभार मडकीं तयार करतो, तीं करतांना त्याचा हात कमजास्त लागल्यामुळें त्या मडक्याचा कांठ लवतो. आतां कांठ लवणें हा दोष मडक्याचा कीं कुंभाराचा! मडकें तर बिचारें प्रथम मृत्तिकारूपानें

असतें. त्याच्या कर्मानें त्याचा कांठ लवला, कीं कुंभाराच्या चुकीनें—दांडगाईनें किंवा निष्काळजी-पणानें—लवला! तसेंच वड्याळें करणारा अनेक घड्याळें करतो. त्यांत कित्येक एकसारखीं मजबूद करतो. त्यांस किंमत एकसारखी ठेवतो. तीं टिक-ण्याचा जिम्मा सारखाच घेतो. परंतु एक जिम्मा घेत-लेल्या मुदतीपेक्षां अधिक चालतें, एक आधींच बंद पडतें, एक यजमानाच्या हातून पडून फुटतें, एकावर मांजर झांप घालतें त्यामुळें त्याचे तुकडे होतात! आतां या घड्याळांचे जे वेगळे वेगळे परिणाम झाले, ते त्यांच्या प्राक्कर्मानेंच झाले, असें ह्मणावें, तर त्या सर्वांचा हा पहिलाच जन्म! '**यद्धात्रा निजभालपट्टलिखितं तन्मार्जितुं कः क्षमः**' (ब्रह्मदेवानें जें आपल्या कपाळीं लिहिलें आहे तें नाहींसें करण्याला कोण समर्थ आहे?) असें ह्मणावें, तर कर्त्याच्या दृष्टीनें तेंही व्यर्थच झालें! तेव्हां सृष्टींतील व्यवहारांविषयींही असेंच अनुमान कर-ण्यास काय हरकत आहे, कीं अमुक व्हावयाचें किंवा तमुक व्हावयाचें असें कांहीं ठरलेलें नाहीं; जसे जसे प्रसंग येतील, त्या त्याप्रमाणें गोष्टी घडतील. त्या अमु-कच घडतील, असें निश्चयानें सांगतां येणार नाहीं. सु-वृष्टि झाली, ह्मणजे शेतें पिकतील, परंतु टोळधाड आ-ल्यास तीं उध्वस्तही होतील! **पानप**तच्या लढाईंत **भाऊ-**साहेबांचा पराजय झाला, ह्मणून आज जी चमत्कारिक स्थिति आपल्या नजरेस पडत आहे ती पडली; तींत जर **भाऊ**साहेबांचा जय झाला असता; तर आज कांहीं वेगळीच स्थिति आपल्या नजरेस पडली असती! शिवाय

प्राक्कर्म ह्मणजे पूर्वींच्या जन्मींचा आपला प्रयत्नच आहे, हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे.

९ जे पुनर्जन्म मानीत नाहींत, त्यांस या प्राक्कर्माचा कांहीं उपयोग नाहीं. ते या शंकेचें समाधान असें करितात कीं, आपल्या भक्तांचें धैर्य कसोटीस लावण्यासाठीं परमेश्वर ह्या गोष्टी करतो. आपल्या पुराणांतही अशा कथा आहेत. जे जे सत्यप्रतिज्ञ किंवा दृढव्रत राजे झाले, त्यांच्या त्यांच्या प्रतिज्ञांचें किंवा व्रतांचें रक्षण करतांना, त्यांच्यावर केवढाले प्रसंग आले; व त्यांनीं ते सर्व सहन करून, आपल्या प्रतिज्ञांचें किंवा व्रतांचें रक्षण कसें केलें; हें त्या कथांवरून दिसून येण्यासारखें आहे. अशा सत्वशील मनुष्यांचें सत्व हरण करण्याचे प्रयत्न प्रत्यक्ष ईश्वरानें केले.

श्रियाळाचें सत्व पहाण्याकरितां, **शंकरांनीं** त्याच्या मुलाचें मांस शिजवून देण्याविषयीं त्यास सांगितलें. जगांत तरी अनेक संकटें आल्याशिवाय मनुष्याचें धैर्य कसास लागत नाहीं, व त्याची कीर्ति होत नाहीं. **सीतेला रावणानें** चोरून नेलें व तिला वश करण्याकरितां अनेक प्रयत्न केले, तरी ती त्याला वश झाली नाहीं, ह्मणून तिला पतिव्रता स्त्रियांत अग्रगण्यत्व मिळालें. **हरिश्चंद्रानें** आपलें स्वप्नांतलें वचन पाळलें, व **विश्वामित्रानें** दिलेला दुःसहताप सहन केला, ह्मणून त्याचें नांव अजरामर झालें. तेव्हां हेंही मत केवळ अग्राह्य आहे असें नाहीं.

असो. प्राक्कर्म किंवा पूर्वकर्म याचाही उपयोग नशीब या अर्थी होतो, व वरील शास्त्राधारास अनुलक्षून

‘ **कर्मणो गहना गतिः**’ (कर्माची गति गहन आहे). ‘ **तस्मै नमः कर्मणे** ’ त्या कर्माला नमस्कार असो. इत्यादि वाक्यें अनेक ठिकाणीं येतात.

६ पापपुण्याप्रमाणें (पूर्वकर्माच्या फळाप्रमाणें) ज्या ज्या अवस्था किंवा जीं जीं सुखदुःखें प्राप्त व्हावयाचीं, तीं तीं सर्व **ब्रह्मदेव** आपल्या कपाळावर लिहून ठेवतो, अशी समजूत असल्यामुळें त्यालाच ‘ विधि ’ ‘ कपाळ ’ असेंही ह्मणतात. ‘ **यत्पूर्वं विधिना ललाटलिखितं तन्मार्जितुं कः क्षमः** ’ ‘ **चातुर्य पूर्ण लिहिलें विधिनें कपाळीं** ’ ‘ तेंच झालें कीं खरें हा **कपाळा**.’ हीं शब्दाच्या अशा उपयोगाचीं उदाहरणें होत.

७ केव्हां केव्हां असें होतें कीं, एका मनुष्याचा गुण किंवा दोष, पुष्कळ मनुष्यांस उपयोगी पडणारा किंवा पीडा करणारा होतो. गलबतावरील नावाडी जर गलबत हाकारावयास चुकला, तर त्याच्या दोषाचें प्रायश्चित्त गलबतावरील सर्व लोकांस भोगावें लागतें. आगगाडी हाकणाराची किंवा लोखंडी रस्त्याचा सांधा दाबणाराची चूक, आगगाडींतील पुष्कळ मनुष्यांस बाधक होते. राजा दुर्गुणी निघाला, तर त्याच्या सुखदुःखाचें विभागी सर्व राष्ट्रास व्हावें लागतें. **शिवाजी महाराष्ट्रांत** उदयास येण्याबरोबर, **कोंकणांतले कोंकण्ये** व **मावळांतले मावळे** यांचें दैव उदयास आलें; ते मांडचोळणे घालून तरवारी घेऊन लढण्यास तयार झाले, व कट्टे योद्धे बनले; फिरून **इंग्रजांनीं** आपल्या हातांत राज्याचीं सूत्रें घेण्याबरोबर त्यांचें दैव मावळलें, व ते आपले फिरून गवत वहाणारे व काबाडकष्ट करणारे झाले!

थोरले बाजीराव पेशवे घोड्यावर स्वार होऊन चमकूं लागण्याबरोबर, शान्तिपुष्टि करणारे ब्राह्मण घोड्यांवर बसून, **परशुरामाचा** कित्ता गिरवून, एक टकार टाकून मोकळे झाले; व नवा अवतार धारण करून, **अफगाणां**सारख्या योद्ध्यांना डोईजड झाले! तेच दुसऱ्या **बाजीरावाच्या** कारकीर्दींत फिरून वेद घोकावयास लागले, व लाडू, जिलिब्या यथेच्छ झोडून घोरत पडूं लागले; या **बाजीरावा**नें आपलें राज्य गमावण्याबरोबर, हेही आपलें सर्व ऐश्वर्य गमावून बसले; व **इंग्रजांचा** बाणेदार अंमल होण्याबरोबर, आपलीं हत्यारेंपात्यारें गमावून गाईपेक्षां गाय होऊन गेले! आतां या ठिकाणीं दैव किंवा प्राक्कर्म ह्मणावें, तर तें सगळयाच व्यक्तींचें एकदम एकसारखें कसें झालें! अशा ठिकाणीं **'काळ'** या शब्दाची योजना करितात. एखाद्या कुटुंबावर एकापाठीमागून एक अनेक संकटें कोसळलीं, ह्मणजे त्या कुटुंबाचा काळ फिरला, असें ह्मणतात. एखाद्या देशावर संकटांमागून संकटें येऊं लागलीं, ह्मणजे त्या देशाचा काळ फिरला, असें ह्मणतात. एखाद्या राष्ट्रांतील सन्मान्य व्यक्ति एकामागून एक लयास जाऊं लागल्या, ह्मणजे त्या राष्ट्राचा काळ फिरला, असें ह्मणतात. **पानपत**च्या लढाईपासून मराठ्यांचा काळ फिरला, असे प्रयोग वारंवार येतात. अनुकूळ वेळीं व प्रतिकूळ वेळींही ' काळ ' या शब्दाचाच प्रयोग होतो. **'सर्व यस्य वशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नमः'**

काळ फिरला, ह्मणजे सर्वच गोष्टी विपरीत होतात, अशाबद्दल असा एक श्लोक आहेः—

अप्सु प्लवंते पाषाणा, मानुषा घ्नन्ति राक्षसान् ।
कपयः कर्म कुर्वन्ति, कालस्य कुटिला गतिः ॥ १ ॥

कवि ह्मणतो, काळ फिरला, ह्मणजे सर्वच गोष्टी विपरीत होतात. दगड पाण्यांत बुडतात, हें सर्वांस माहीत आहे; परंतु तेच दगड पाण्यावर तरूं लागतात! राक्षस मनुष्यांना खातात, हें सर्वांस माहीत आहे; परंतु तींच मनुष्यें राक्षसांना मारतात! वानरें ह्मणजे चेष्टा करणारीं, त्यांनीं तो काय पराक्रम करावा, परंतु तींच लढाईंत मोठा पराक्रम दाखवतात! हा सगळा पराक्रम काळाचा आहे. या सगळ्या गोष्टी **रामायणां**तल्या आहेत. **रावण** हा राक्षस व **राम** हा मनुष्य, परंतु **रामानें रावणाचा** वध केला, समुद्रावर सेतु बांधला, व वानरांचें सैन्य लढाईकरितां गोळा केलें, या कथेवर सर्व लक्ष आहे. एखाद्या व्यक्तीला, देशाला किंवा **राष्ट्राला** जसा चांगला काळ येतो, तसा वाईटही येतो. जर सुदैव ह्मणजे चांगला काळ येतो, तर दुर्दैव ह्मणजे वाईट काळ आलाच पाहिजे. वाईट काळ येतो, ह्मणून आपण आपलें धैर्य सोडून स्वस्थ बसावयाचें नाहीं, हें वर सांगितलेंच आहे. हें सुदैव किंवा दुर्दैव प्रत्येकाच्या हातांत किती आहे, याचा विचार पुढें करावयाचा आहे. आतां दुर्दैवाचा काळ व्यक्तीला किंवा देशाला किंवा राष्ट्राला येतो, याबद्दल थोडींशीं उदाहरणें पुढें दाखल करतों.

(१) **कृष्णावतार** समाप्त झाल्यावर **अर्जुना**ची जी दुर्दशा उडाली, तिचें पुढील श्लोकांत वर्णन आहे.

त एवामी बाणास्तदपि हरलब्धं धनुरिदं
स एवाहं पार्थः प्रमथितसुराराातिनिचयः ।
इमा स्तास्ता गोप्यो हरिचरणचित्तैकशरणाः
ह्रियंते गोपालैर्विधिरपि बलीयान्न तु नरः ॥ १ ॥

अर्जुन ह्मणजे भारतीय योद्ध्यांपैकीं प्रसिद्ध योद्धा. त्याचा पराक्रम मोठा विख्यात. नेहमीं जय मिळावयाचा ह्मणून **विजय** हें ज्याचें नांव. त्यालाच काळ जेव्हां प्रतिकूळ झाला, तेव्हां त्याचें कांहींएक चालेना. त्यावेळेस तो आपल्या स्थितीचें वर्णन करतो. **अर्जुन** ह्मणतोः—अरेरे! तेच ना हे माझे बाण, तेंच हें **शिवा**-पासून प्राप्त झालेलें धनुष्य, तोच हा मी **अर्जुन** कीं ज्यानें दानवांचा सुद्धां संहार केला, आणि ही जुनीच सामग्री असतां, **कृष्णाच्या** पायांशीं ज्यांचा शुद्धभाव, अशा ह्या गोपी ह्या वनचरांनीं हरण करून न्याव्या काय? तस्मात् दैव हें प्रबल होय, व नराचा पराक्रमाविषयीं अभिमान सारा खोटा!

(२) **फ्रान्स** देशाचा पराक्रमी बादशाहा **नेपोलियन** बोनापार्ट हा आपल्या अमदानीच्या भरांत असतां, वारंवार असें ह्मणत असे कीं, 'अशक्य हा शब्द माझ्या कोशांत मुळींच सांपडत नाहीं;' ह्याचा अर्थ एवढाच कीं 'श्रमसाध्य नाहीं, असें कार्यच नाहीं,' आणि ही गोष्ट त्यानें प्रतीतीस आणून दिली होती. तो छाती ठोकून पुढें निघाला, कीं शेंकडों वीर जयजयकार करीत त्याच्या मागें निघत; व त्याच्या बरोबर लढाईची शिकस्त करून जय मिळवीत! युरोपांतील सर्व राष्ट्रांस त्यानें धास्ती पाडली होती, असा तो पराक्रमी होता. परंतु ज्यावेळेस

विपरीत काळ आला, त्यावेळेस त्यालाच निमूटपणें **सेंट-हेलीना** बेटांत प्रतिबंधांत रहावें लागलें!

(३) आपल्या पुराणांतील **रावणाचा** पराक्रम काय थोडा होता! त्यानें तेहतीस कोटि देवांस बंदींत घातलें होतें, परंतु विपरीत काळ प्राप्त झाला, त्यावेळेस **रामा-सारख्या** पराक्रमी मनुष्यानें त्याचा नाश केला!

(४) मराठ्यांच्या कारकीर्दींत मराठ्यांनीं **अटकेपर्यंत** झेंडा लाविला होता, पण आज त्यांच्याकडे पाहूं लागल्यास, ज्यांच्याकरितां **कलकत्त्याच्या इंग्रज** लोकांनीं '**मराठा डिच**' तयार केला, किंवा **बंगाली** लोक बागुलबोवाच्या बदला ज्या '**मराठा**' शब्दाचा उपयोग करीत, तेच हे मराठे, असें वाटणेंही कठीण झालें आहे! केव्हां केव्हां तर असें वाटतें कीं, त्यावेळचे मराठे व हल्लींचे मराठे एकच नव्हत!

८ या विपरीत काळांत आपण वागावें कसें, हें मात्र चांगलें लक्षांत ठेवलें पाहिजे. आपल्यास उद्योगानें दैव सहाय होवो, किंवा स्वेच्छेनें सहाय होवो, (हें मानणें केवळ मनावर आहे.) परंतु ज्यावेळेस दैव सहाय होईल, त्यावेळेस तें केव्हां तरी प्रतिकूळ होईल, हें आपण लक्षांत ठेवावें. प्राप्त झालेल्या ऐश्वर्याच्या मदानें धुंद होऊं नये. कोणास विनाकारण ताप देऊं नये. ह्मणजे पुढें दुर्दैवाचा काळ प्राप्त झाला, तरी आपल्यास दुःख होणार नाहीं. दुर्दैवाचा काळ ह्मणजे विपरीत काळ प्राप्त झाला, ह्मणजे आपल्या मनांत नेहमीं धैर्य ठेवावें, व पुढें केव्हां तरी सुदैवाचा काळ येईल, हें लक्षांत ठेवावें. '**सुखस्यानंतरं दुःखं दुःखस्यानंतरं सुखं.**'

(सुखाच्या मागून दुःख व दुःखाच्या मागून सुख) स्थित्यंतर हें या सृष्टीला एकसारखें लागलेलेंच आहे. क्षीण झालेला चंद्र फिरून वृद्धि पावतो, तोडलेलें झाड फिरून फुटतें, ह्या गोष्टी लक्षांत आणून आपलें समाधान करीत असावें, ह्मणजे आपल्यास दुःखाची बाधा होणार नाहीं.

९ प्रयत्नवादी असो किंवा दैववादी असो, त्यास केव्हां अनुकूळ व केव्हां प्रतिकूळ काळ येतोच, परंतु हा सृष्टिक्रम आहे. प्रत्येक मनुष्यास मरण यावयाचें आहे, ह्मणून त्याची भीति बाळगून काय उपयोग! एक मेला ह्मणून दुसऱ्यानें नुसती भीति पावून मरण्यांत काय अर्थ! आपण आपलें कर्तव्य काय आहे, तें ओळखून चालावें. प्राप्त होणाऱ्या स्थितीचा रिकामा बाऊ बाळगूं नये. चालेल तेवढा प्रयत्न करावा, व येणाऱ्या संकटांतील टाळवतील तेवढीं संकटें टाळावीं; व टाळतां येणार नाहींत तीं सोसावीं! कुरकुर करण्यापासून फायदा होत नसून त्रास मात्र होतो. आपलें कर्तव्य आनंदानें केल्यास कोणतीही स्थिति सुखकारक होते.

१० पुष्कळ वेळां आपण ज्यास दुर्दैव असें ह्मणतों, तें खरें दुर्दैव नसतें. पुष्कळ ठिकाणीं आपला प्रयत्न चुकतो, आपण हयगयीनें वागतों, अव्यवस्था करतों, किंवा लक्ष देत नाहीं. उन्हाळयांत नदींत डुंब डुंब डुंबावयाचें, व आजारी पडल्यावर आपल्या कर्मास बोल लावावयाचा! कलिंगडासारखीं फळें—स्वस्त मिळतात ह्मणून—खा खा खावयाचीं व बाधलीं ह्मणजे नशीबाच्या नांवानें हाका मारावयाच्या! तरुणपणांतला काळ

यथेच्छ वागण्यांत घालवावयाचा, रात्रीला दिवस ह्मणावयाचें, झोंपेला फांटा द्यावयाचा, विश्रांतीची पर्वा करावयाची नाहीं, जें करूं नये तें करावयाचें, व ह्मातारपणांत शक्ति नाहींशी झाली, नाहीं नाहीं ते रोग जडले, ह्मणजे हाका मारावयाच्या व दैवाला दोष लावावयाचा, यांत तात्पर्य काय!

११ दुसऱ्या **बाजीरावानें** जेवणावळींचा सुकाळ केला; सरदारांस घरीं बसविलें; दीक्षित, शास्त्री, पंडित, ह्यांना सरदाऱ्या दिल्या; अज्ञानी लोकांचें स्तोम माजविलें; मक्त्यानें मामलती दिल्या; हलक्या लोकांस हुद्यावर चढविलें; आणि **इंग्रजांनीं** स्वारी केली, तेव्हां पर्वतीस अनुष्ठान बसविलें; यापासून काय होणार! दर्भाचे बाण होण्याचे हे दिवस नव्हेत, हें कोणाच्या लक्ष्यांत आलें नाहीं. झाडावर चढलेला चोर सांपडावा, ह्मणून त्या झाडाच्या भोंवतीं सोंवळें लुगडें गुंडाळून, भोळ्याबाईनें जो चोराचा बंदोबस्त केला, त्यांतलाच हा प्रकार! अशा रीतीनें आपल्या प्रयत्नांत चुकून दुर्दैवानें पेशवाई घालविली, ह्मणून दुःख करण्यांत हांशील काय!

असो. नशीबाचे पर्यायवाचक शब्द कोणते आहेत, त्यांच्या अर्थांत फरक किती आहे, त्यांचा व्यवहारांत उपयोग कसा होतो, सुदैव व दुर्दैव प्राप्त झालें असतां वागावें कसें, एवढ्या गोष्टींचा विचार झाला. आतां नशीबांत बदल होतो किंवा नाहीं व होत असल्यास कशानें होतो, याचा विचार करावयाचा.

४ नशीबांत बदल होतो कीं काय?

‘ आरभ्यते न खलु विघ्नभयेन नीचैः

प्रारभ्य विघ्नविहता विरमन्ति मध्याः
विघ्नैः पुनःपुनरपि प्रतिहन्यमानाः
प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ॥ १ ॥'

१ हा भर्तृहरीचा श्लोक आहे. यांत त्यानें लोकांचे तीन वर्ग केले आहेत. नीच, मध्यम व उत्तम. विघ्नें येतील, ह्या भयानें जे कार्याला आरंभच करीत नाहींत, त्यांस त्यानें हलक्या प्रतीचे लोक असें ह्मटलें आहे, हें त्याचें ह्मणणें वाजवी आहे. निर्विघ्नपणें कार्य तडीस जावें हें चांगलें. परंतु असें नेहमीं घडणें शक्य नाहीं. मोठमोठ्या कार्यांस तर, कालावधि लागण्याचा संभव असल्यामुळें, अनेक विघ्नें यावयाचींं. याकरितां विघ्नांला भिणाऱ्या मनुष्यापासून कार्यारंभ होतो कशाला? परंतु ज्याला कार्य तडीस लावावयाचें असेल, त्यानें या वर्गात शिरतां कामा नये. कारण, पोंहावयास शिकावयाचें असलें, तर पाण्यांत शिरणें, गटांगळ्या खाणें, नाकातोंडांत पाणी जाणें, या गोष्टींस जसें भितां उपयोगी नाहीं; तसेंच कार्यांत विघ्नें येतील, ह्मणून त्यास आरंभच करावयाचा नाहीं, हाही विचार उपयोगाचा नाहीं. **मोरोपंतांनीं** ह्मटलें आहे:—'**कां न सदन बांधावें कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस**' उद्यां घरांत घूस बिळें पाडील, ह्मणून आज आपण घर बांधण्याचा उद्योग टाकून द्यावा काय? टाकून द्यावा असें ह्मटल्यास, कोणतीही गोष्ट घडण्याची आशा नको. कारण सर्व वस्तूंचा केव्हां तरी नाश होणार आहे व प्रत्येक कार्यांत थोडीं तरी विघ्नें येणारच आहेत, मग जर आरंभच नाहीं, तर ती गोष्ट शेवटास जाण्याची कल्पना हवी कशाला! **ताजमहालासारखीं किंवा इजि-**

ह्मधील मनोऱ्यांसारखीं फार वेळ चालणारीं कामें, विघ्नें आल्याशिवाय का शेवटास गेलीं! परंतु सृष्टीची व्यवस्था या मतानें चालली नाहीं. जुनीं कामें कोसळत आहेत, तरी नवीं कामें लोक बांधीत आहेत. कित्येक कामें विघ्नांमुळें अर्धवट रहात आहेत, तरी कित्येक अचाट कामें दीर्घोद्योगी पुरुषांच्या सतत प्रयत्नानें सिद्धीसही जात आहेत. जेथें वाडा होता, तेथें ओसाड जागा आज दिसत आहे, तरी ओसाड जागेवर हवेली उठतच आहे; तेव्हां विघ्नें येतील ह्मणून कार्याचा आरंभ करावयाचा नाहीं, हें ह्मणणें उपयोगाचें नाहीं. या मतानें सृष्टींतील व्यवहारांची **'मुले कुठारः'** अशी अवस्था होते. असें ह्मणणारांच्या हातून कोणतेंही काम व्हावयाचें नाहीं. ह्मणून **भर्तृहरी**नें अशा मताच्या लोकांस हलके लोक ह्मटलें आहे.

२ 'प्रारभ्य विघ्नविहता विरमन्ति मध्याः'

हे दुसऱ्या प्रकारचे लोक. यांस **भर्तृहरी**नें मध्यम प्रतींत गणलें आहे. हे एखाद्या कार्यास आरंभ करितात, व फारशीं विघ्नें न आल्यास तें कार्य शेवटासही लावतात. पण विघ्नपरंपरा जर का मध्यें आली, तर यांचा दम चालत नाहीं. हे भिऊन जातात. आपण हें काम कोठलें आंगावर घेतलें, असें यांस होऊन जातें. हळू हळू हातीं घेतलेल्या कार्यापासून हे पराङ्मुख होतात. व आपण काम हातीं घेतलें होतें कीं नव्हतें, याचीही खूण यांच्या जवळ रहात नाहीं. हे कार्याला आरंभ करितात हें चांगलें खरें, परंतु तें मध्येंच सोडून देतात हें चांगलें नाहीं. यांनीं तें काम

मध्येंच सोडून दिल्यामुळें खर्चलेला पैसा व केलेले श्रम फुकट जातात, निरुत्साह उत्पन्न होतो आणि तें काम फिरून हातीं घेण्यास कोणी धजत नाहीं. कोणी हातीं घेऊं लागल्यास, लोक मागील उदाहरण दाखवून त्याची नाउमेद करितात, असा मात्र परिणाम होतो. अशा प्रकारच्या लोकांपासून फारसा उपयोग होत नाहीं. हे दैव व उद्योग या जोडीच्या मध्यें **त्रिशंकूराजासारखे** लटपटत रहावयाचे ! तेव्हां यांच्या हातून आपल्या किंवा दुसऱ्याच्या नशीबांत फरक पाडण्याचें अवघड काम कसें तडीस जाईल ! '**निश्चयाचें बळ । तुका ह्मणें तेंचि फळ ॥**' अशा निश्चयी मनुष्यांचें तें काम. '**ना हिंदु ना मुसलमान**' अशा मनुष्यांपासून, जसा एका धर्माचा बळकट अभिमान बाळगून, त्यास जीवाभावानें मदत करण्याचें काम व्हावयाचें नाहीं, तसेंच या मध्यम लोकांपासून नशीबांत फरक पाडण्याचें अवघड काम व्हावयाचें नाहीं. तें करण्यास तुकारामाच्या उक्तीप्रमाणें '**एथें पाहिजे जातीचें, काम नाहीं गव्हाराचें**' अशासारखी मंडळी पाहिजे.

३ '**विघ्नैः पुनःपुनरपि प्रतिहन्यमानाः**
प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ॥'

तें उत्तम मनुष्यांचें काम. त्यांनीं एखादें काम हातीं घेतलें कीं, तें झालें ह्मणून समजावें. विघ्नांवर विघ्नें येवोत, किंवा विघ्नांचे पर्वत आडवे पडोत, उत्तम मनुष्यांनीं हातांत घेतलेलें काम, ते अर्धें सोडणार नाहींत. '**अर्थं वा साधयेत् देहं वा पातयेत्**' हा त्यांचा निश्चय, ते विघ्नपरंपरेला कोठून जुमानणार ! ते हातीं घेतलेलें

काम तडीस तरी लावतील, नाहीं तर करतां करतां मरून जातील! परंतु विघ्नांला भिऊन त्याचा पिच्छा सोडणार नाहींत. **'अंगीकृतं सुकृतिनः परिपालयन्ति.'** त्यांचा अंत झाल्यामुळें तें आरंभलेलें काम जरी अर्धें राहिलें, तरी त्यांचें उदाहरण पाहून लौकरच त्यांच्या तोडीचे व त्यांनीं आरंभलेलें काम शेवटास लावणारे, पुरुष त्यांच्या मागें उत्पन्न होतात. ते त्या कामाचा बोजा आपल्या आंगावर घेतात. याप्रमाणें चालल्यावर, केवढेंही मोठें काम असलें, तरी सहज शेवटास लागतें. असे पुरुष आपलें नशीब बदलतात इतकेंच नव्हे, तर आपल्या बरोबर अनेक लोकांचें, देशांचें, किंवा राष्ट्रांचेंही नशीब बदलतात. असले पुरुष कोणत्याही राष्ट्रांत उत्पन्न होवोत, ते त्या राष्ट्रास भूषणभूत होतात. असे पुरुष उत्पन्न झाल्याखेरीज राष्ट्राची उन्नति व्हावयाची नाहीं. **शिवाजी, पहिला बाजीराव,** वगैरे पुरुष, या वर्गांतले होत. त्यांनीं राष्ट्राच्या नशीबांत केवढा बदल केला, त्याचें वर्णन ' नशीब ह्मणजे काय ' या प्रश्नाचा विचार करतांना आलेंच आहे. तेव्हां नशीबांत बदल होतो, यांत संशय नाहीं.

' आस्ते भग आसीनस्योर्ध्वंतिष्ठति तिष्ठतः
शेते निपद्यमानस्य चराति चरतो भगः ॥ '

या श्लोकानेंही वरील विधानास बळकटी येते. जो बसतो, त्याचें नशीब बसतें, जो उभा रहातो, त्याचें नशीब उभें रहातें, जो निजतो, त्याचें नशीबही झोंप घेतें, व जो चालतो त्याचें नशीब चालतें; असा वरील श्लोकाचा अर्थ आहे. यावरून नशीबांत बदल होतो,

व तोही उद्योगाप्रमाणें होतो, हें उघड आहे. हा जर पडून राहिला, तर याचें नशीब हालणार नाहीं; व हा बसून राहिला, तर याचें नशीब उभें राहणार नाहीं. तेव्हां आपलें नशीब चांगलें व्हावें, अशी ज्याला ज्याला इच्छा असेल, त्याणें प्रथम उद्योगास लागावें. उद्योग हे नशीबाचे हातपाय आहेत. आतां नशीबांत जो बदल होतो, तो कशापासून होतो, याचा विचार करावयाचा.

५ नशीबांत बदल होत असल्यास कशानें होतो?

तो संगतीनें व उद्योगानें होतो. आपण आपल्या स्वतःच्या प्रयत्नानें आपलें नशीब बदलावयाचें, किंवा चांगल्याच्या संगतीनें (ह्मणजे चांगल्याच्या उद्योगानें) बदलावयाचें. सामान्य गोष्टींतही याचे दाखले पुष्कळ येतात.

१ प्रथम संगतीनें कसा बदल होतो तो पाहूं.

(१) एखादा मनुष्य चोहींकडून बंद अशा विहिरींत पडतो, व त्यास पोहतां येत नसल्यामुळें गटांगळ्या खाऊं लागतो. भोंवतालीं बरेच लोक जमतात, परंतु कोणास पोंहतां येत नसलें, ह्मणजे ते त्याच्याकडे पाहून नुसते हळहळतात, व बिचाऱ्याचें नशीब फुटकें असें ह्मणूं लागतात. इतक्यांत एखादा धाडसी व अट्टल पोंहणारा जर त्या रस्त्यानें आला, तर तो इतरांप्रमाणें कौतुक पहावयास न लागतां, एकदम विहिरींत उडी टाकतो, व बुडणाराच्या नशीबांत फरक पाडून त्यास जिवंत बाहेर काढून घेऊन येतो! या ठिकाणीं बुडणाराचा प्रयत्न त्याच्या उपयोगीं पडला नाहीं, तर पोंहणाराची संगति उपयोगीं पडली.

(२) एखादा आसन्नमरण रोगी असला, व त्यास कोणी उपचार करणारा नसला, ह्मणजे तो आपलें नशीब असें ह्मणून मरणाची वाट पहात बसतो. परंतु इतक्यांत जर रोगाची परीक्षा करणारा धन्वंतरी तेथें आला, तर तो त्या रोग्याच्या नशीबांत फरक पाडतो, व त्याला औषध देऊन हुशार करतो. आतां दैववादी ही अकल्पित गोष्ट त्याच्या नशीबानें घडली, असें ह्मणतात, प्रयत्नवादी संगतीकडे व यत्नाकडे त्याचें यश देतात. गुणी मनुष्य वेळेवर येणें, हें नशीब असें ह्मटलें, तरी त्यानें प्रयत्न केल्याशिवाय गुण यावयाचा नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. योग्य वस्तु एकत्र मिळणें एवढाच नशीबाचा योग मानला, तरी प्रयत्नाशिवाय त्यांचें एकत्र मिळणें व्यर्थ जातें, याचा विचार केला ह्मणजे उद्योगाकडेच महत्व येतें. यांतही रोग्याचा प्रयत्न कारण नाहीं ह्मणून वैद्याची संगति यास कारण झाली असें ह्मटलें आहे.

(३) **ग्रेस डार्लिंग व जान कारून,** यांनीं स्वतः मोठें धाडस करून, आपल्या दीर्घ प्रयत्नांनीं किती मनुष्यांचे जीव वांचविले, हें सर्वांस ठाऊक आहे. ही मंडळी जर दैववादी असती, व त्यांच्या नशीबांत असेल तसें होईल असें ह्मणती, तर गलबतावरील लोकांचे प्राण वांचते काय? एका क्षणांत समुद्राच्या पोटांत जाणाऱ्या मनुष्यांस, **ग्रेस डार्लिंग हिनें** वांचविलें; व अग्नीच्या धडाक्यांत जळून जाणाऱ्या, किंवा समुद्रास आपला जीव अर्पण करणाऱ्या लोकांस,—सर्व आग आपल्या आंगावर घेऊन, व तिचा दुःसह ताप सहन करून,—**जॉन**

काक्रनानें वांचविलें; हें केवळ त्यांच्या दीर्घप्रयत्नावरच्या अप्रतिम भरंवशानें सिद्धीस गेलें.

(४) निरुपयोगी विद्यार्थी ह्मणून ज्याला शिक्षकवर्गानें सोडलें, त्याला हातीं धरून त्याच्यांत कोणता अंकुर आहे तो पाहून, योग्य मार्ग दाखवून, एखादा सद्गृहस्थ त्याला थोर पदास चढवितो, ह्मणजे त्याच्या नशीबांत बदल करतो.

(५) मुक्यांस बोलावयास व आंधळ्यांस वाचावयास शिकविलेलें कोणीं पाहिलें होतें ? परंतु प्रयत्नी मनुष्यांनीं त्यांसही बोलावयास व वाचावयास शिकवून,—जें दुर्घट काम होणें अशक्य असें बहुतांस वाटतें,—तें घडवून आणून, ' यत्नेन किं दुर्लभं ' ह्याची सत्यता जगास दाखविली आहे.

(६) ह्यावरून हें उघड आहे कीं, सत्संगति मिळाल्यास ' पुष्पसंगें मातीस वास लागे ' या कवीच्या उक्तीप्रमाणें नशीबांत बदल होण्यास कांहीं हरकत नाहीं. सत्संगति काय पाहिजे तें करूं शकेलः—

जाड्यं धियो हरति सिंचति वाचि सत्यं
मानोन्नतिं दिशति पापमपाकरोति ।
चित्तं प्रसादयति दिक्षु तनोति कीर्तिम्
सत्संगतिः कथय किं न करोति पुंसाम् ॥ १ ॥

सत्संगति बुद्धीचा जडपणा नाहींसा करते, वाणीस खरें बोलण्याची संवय लावते, मान वाढविते, पाप करूं देत नाहीं, मन प्रसन्न करिते, दशदिशांना कीर्ति पसरवित्ये, तेव्हां सत्संगति काय करीत नाहीं? पाहिजे तें करते.

२ आतां उद्योगानें कसा बदल होतो तो पाहूं.

(१) एखादा डोंगर पुढें आला, ह्मणजे दैववादी माझें नशीब ह्मणून, उद्योग न करतां, त्या डोंगराच्या पायथ्याशीं बसून राहील, तर कित्येक दिवसपर्यंत किंवा दव अनुकूल होईपर्यंत, तो जागच्या जागींच राहील. उद्योगी मनुष्य आपल्या सामर्थ्याप्रमाणें मजल करून, केव्हां तरी डोंगराच्या माथ्यावर जाईल. दैववादी नशीब अनुकूल झाल्यावर कदाचित् पंख फुटून डोंगराच्या पलीकडे जाईल! परंतु ही गोष्ट विद्येला लागू नाहीं. नशीब अनुकूल झालें, तरी उद्योगाशिवाय विद्या प्राप्त व्हावयाची नाहीं. ती एकदम मिळावयाची नाहीं. **'क्षणशः कणशश्चैव विद्यामर्थंच चिंतयेत्'** ह्या मार्गाचा स्वीकार करावा, तेव्हांच ती प्राप्त होईल. नशीबानें द्रव्याचा ठेवा सांपडेल, परंतु विद्वत्ता प्राप्त होणार नाहीं. यावरून उद्योग नशीबांत फरक पाडील. तेव्हां सत्संगतीनें जसा नशीबांत बदल होतो, तसाच उद्योगानेंही होतो.

(२) **बेंजामिन फ्रांक्लिन** जेव्हां **फिलाडेल्फिआ** येथें गेला, तेव्हां त्याच्या जवळ जेवणापुरतेही पैसे नव्हते. परंतु तो आपल्या उद्योगानें श्रीमंत झाला. त्यानें श्रीमंत होण्याचें साधन एका ग्रंथांत असें लिहून ठेविलें आहे. " बाजारच्या रस्त्याप्रमाणें संपत्ति मिळविण्याचा रस्ता सरळ आहे. संपत्ति मिळवण्याचीं साधनें दोन. उद्योग व मितव्यय. उद्योग व मितव्यय यांशिवाय कांहीं होणार नाहीं, व यापासून सर्व होईल. उद्योगीपणा हा चांगल्या नशीबाचा जनिता आहे. ईश्वर उ-

द्योग्याला सर्व कांहीं देतो. 'उद्योग्याच्या घरीं, रिद्धि सिद्धि पाणी भरी.' होईल तितकें काम आज करीत जा. कारण उद्यां त्याला किती विघ्नें येतील, याचा नियम नाहीं. जर तूं चाकर असतास, आणि तुझ्या धन्यानें तुला आळशी ह्मटलें असतें, तर तुला लाज वाटती कीं नाहीं ? तर तूं धनी असलास, तरीही आळशी होऊं नको. आपल्यास आळशी ह्मणवून घेण्याची तुला लाज वाटूं दे." हा त्या उद्योगी मनुष्याचा लेख वाचून, कोणाचें मन प्रसन्न होणार नाहीं ! यांतलें वाक्य 'उद्योगीपणा हा चांगल्या नशीबाचा जनिता आहे' हें या ठिकाणीं मनन करण्यासारखें आहे. ज्याप्रमाणें संगति नशीबांत बदल करते, त्याप्रमाणेंच उद्योग नशीबांत बदल करतो. उद्योगाकडे नशीबाचें जनकत्व आहे. सज्जन आपल्या संगतीनें दुसऱ्यांस चांगलें करितात, तरी त्यांस ते सद्गुण उद्योगाशिवाय प्राप्त होत नाहींत. नुसत्या संगतीनें विद्या यावयाची नाहीं, तिला उद्योगाचें साह्य पाहिजे. नुसत्या सहवासानें—लोहपरिसाप्रमाणें भेटीनेंच—कार्य फार थोडक्या ठिकाणीं घडतें. याकरितां संगति जसा नशीबांत बदल करूं शकते, तसाच उद्योगही करूं शकतो. केव्हां केव्हां तर या कामांत उद्योगासच अधिक यश येतें, असें दिसतें.

६ संगति व उद्योग यांचा संबंध नशीबाशीं कितपत असतो ?

(१) प्रथम संगतीविषयीं विचार करूं.

(१) संतप्तायसि संस्थितस्य पयसो नामापि न ज्ञायते

मुक्ताकारतया तदेव नलिनीपत्रस्थितं राजते।
स्वात्यां सागरशुक्तिमध्यपतितं सन्मौक्तिकं जायते।
प्रायेणाधममध्यमोत्तमगुणः संवासतो जायते ॥ १ ॥

भर्तृहरी ह्मणतो कीं:—तापलेल्या लोखंडावर जर पाण्याचा ठिपका पडला, तर तो पडला होता किंवा नाहीं, याची खूणही रहात नाहीं. बरें तोच जर कमळाच्या पानावर पडला, तर मोत्याप्रमाणें चमकूं लागतो; व स्वातीनक्षत्रामध्यें पर्जन्यबिंदु समुद्रांतील शिंपल्यांत पडला, तर उत्तम रंगाच्या मोत्याचें स्वरूप पावतो; तेव्हां मनुष्याला उत्तम, मध्यम, किंवा कनिष्ठ, जी स्थिति प्राप्त होते, ती संगतीच्या योगानें होते. निर्जीव वस्तूंस जी गोष्ट लागू आहे, तीच सजीव वस्तूंसही लागू आहे. लहानपणीं सर्वांची बुद्धि अगदीं निर्मळ असते. पुढें तिच्यांत संगतीच्या गुणांप्रमाणें गुणदोषांची छटा दिसूं लागते. आईबापांची प्रतिमा मुलांमध्यें आपोआप उठते. त्यांस अपशब्द आवडत असले, तर तींही त्या कामांत पटाईत होऊन जातात. त्यांच्या तोंडांतून अपशब्द निघत नसला, तर मुलांसही अपशब्दांचा उच्चार करावयास लाज वाटते. आईबापांचे बरेवाईट गुण अपत्यांमध्यें सहज उत्पन्न होतात. त्या बरेवाईट गुणांप्रमाणें त्यांची जगांत किंमत होते. तेव्हां आपलें नशीब संगतीनें बनतें असें झालें. **'ज्या जैसी संगति त्यासी तैसी गति'** या **रामदासांच्या** उक्तीप्रमाणें आपण चांगल्याची संगति केली, तर चांगले होऊं; व वाईटाची केली, तर वाईट होऊं. संगमरवरी दगड जरी असला; तरी त्याला जोत्याला लावणें किंवा त्याची मूर्ति बनवणें, हें तो दगड

ज्याच्या संगतीनें असेल, त्याच्या स्वाधीन आहे. त्याची मूर्ति जरी बनवली, तरी ती कुरूप किंवा सुरूप करणें, हें ती घडविणाऱ्या कारागिराच्या स्वाधीन. अडाणी मनुष्याच्या हातांत जर तो दगड पडला, तर तो त्याची वेडीवांकडी मूर्ति बनवील, किंवा मूर्ति बनवितांना त्या दगडालाच मोक्षपदाला घालवील ! तोच दगड जर कुशल कारागिराच्या हातीं लागला, तर तो त्याची सर्वांगसुंदर मूर्ति बनवील; व मग ती सर्वांच्या आदरास पात्र होईल. **'चंदनासंगतीं चंदनचि होती, होय काळी माती कस्तूरिका.'** मलयपर्वतावर चंदनाचे वृक्ष पुष्कळ असतात, यामुळें तेथील झाडें चंदनाच्या संगतीनें सुवासिक बनतात. कस्तूरी काळी, व मृत्तिका काळी. कस्तूरीचें मोल मृत्तिकेस येण्याचा मुळींच संभव नाहीं. परंतु तिला कांहीं दिवस कस्तूरीच्या संगतीला ठेवलें, कीं, तिला कस्तूरीचें मोल येतें. पोपटाच्या आंगांत बोलण्याची शक्ति ईश्वरानें ठेवली आहे, ह्मणून आह्मीं शिकवलें ह्मणजे त्याला बोलतां येतें, हें खरें; परंतु तो पोपट सज्जनाच्या संगतीला असला, तर मर्यादेचे व गोड शब्द बोलेल; परंतु दुष्टाच्या संगतीला असला, तर अमर्याद व दांडगे शब्द बोलेल. पहिल्या पोपटाचे शब्द ऐकून कोणासही संतोष होईल; व दुसऱ्याचे ऐकून कोणासही संताप येईल ! तेव्हां पोपटाची वाणी जरी एकच, तरी तिची किंमत संगतीच्या योगानें वेगळी वेगळी झाली. चंदनाच्या झाडाच्या संगतीनें भोंवतालच्या झाडांस चंदनाचा वास लागतो, परंतु जळणाऱ्या झाडाच्या संगतीनें, भोंवतालचीं झाडें जळून जातात !

असेंच मनुष्याचें आहे. जे जे गुण मनुष्यास प्रिय आहेत, समाजास हितकारक आहेत, व लोकांची उन्नति करणारे आहेत, ते ते जो सत्संगतीनें संपादन करील, तो सर्वांस प्रिय होईल, व आपलें नशीब चांगलें करूं शकेल. जो कुसंगतीनें वागून आपणास दुर्गुणांचें स्थान बनवील, ज्याच्यापासून समाजाचें अणुमात्र हित होणार नाहीं, व जो समाजास कांट्यासारखा टाकाऊ वाटेल, तो कोणास आवडणार नाहीं, व त्याचें नशीब सहजच वाईट होईल. यावरून हें उघड आहे कीं, सद्गुण किंवा दुर्गुण प्रथम संगतीनें लागतात. बहुतेक शिक्षण आपल्यास अनुकरणानें प्राप्त होतें. अनुकरण आपण भोंवतालच्या मंडळीचें करतों. आपल्या भोंवतालच्या मंडळीचे सुगुण किंवा दुर्गुण, आपल्यास न समजतां लागत असतात, तेच नेहमींच्या अभ्यासानें दृढ होत जातात, व आपण त्या मंडळींतलेच एक बनून जातों. आरशांत आपलें प्रतिबिंब पाहिलें, ह्मणजे तोंडाला काळें लागलें आहे कीं काय, हें कळतें, नाहीं तर कळत नाहीं. सत्संगतिरूप आरसा आपल्यास पहावयास मिळाल्यास, आपले दुर्गुण आपल्या नजरेस पडतात, नाहीं तर आपल्या आंगीं आहेत ते सद्गुण, अशी आपली कल्पना असते. (२) एक सद्गुण जर मनुष्याच्या आंगांत असला, तर दुसरे अनेक सद्गुण त्याच्या संगतीनें त्यास प्राप्त होतात. एक दुर्गुण जर त्याच्या आंगांत असला, तर उत्तरोत्तर तो दुर्गुणी बनत जातो.

खरें बोलण्याचा गुण एखाद्याच्या आंगांत स्वाभाविक असला, किंवा एखाद्यानें खरें बोलण्याचा निश्चय

केला, तर ज्या वाईट गोष्टी दुसऱ्यांस कळविण्याजोग्या नसतील, त्या नुसत्या पहाणेंही त्याच्या उपयोगाचें नाहीं; मग त्या करण्याची गोष्ट बोलावयासच नको! कारण खरें बोलल्यास वाईट गोष्टी बाहेर पडतील, न बोलल्यास नियम मोडेल, यामुळें वाईट गोष्टींपासून तो सहज दूर होतो, व दुर्जनांचा सहवास त्यास लागत नाहींसा होतो. **मोरोपंतांनीं** ज्याविषयीं:—**'दुर्जनसहवास सदा तापद हो नरक काय सामान्य'**—असें ह्मटलें आहे, त्याचा त्रास त्याला कधींच होत नाहीं. मनुष्य हा संगतिप्रिय आहे. त्याला संगतीवांचून सौख्य वाटत नाहीं. तेव्हां ज्या मनुष्यांच्या संगतीनें आपल्यास सुख होईल, किंवा ज्या मनुष्यांस त्याचे गुण आवडतील, अशांजवळ तो संगतिसुखाकरितां राहील; ते सद्गुणांचे भोक्ते व सद्गुणी असल्यामुळें, हाही त्यांच्यासारखा सद्गुणी बनेल. एखाद्या तळ्यांत एकदा कमळांची लागवड करून दिली, ह्मणजे पुढें तें सर्व तळें कमलमय होऊन जातें, व त्यांतील निरुपयोगी रान आपोआप मरून जातें! बरें त्यांत जर गोंडाळ वाढत चालली, तर ती हळू हळू इतकी वाढते कीं, ती कमळांचें निर्मूलन करून टाकते! वरील उदाहरणांतला मुलगा जर खोटें बोलणारा असला, तर तो खोटें बोलेल व तें छपवण्याकरितां दुसरें एखादें वाईट काम करील; तें बाहेर पडूं नये ह्मणून आणखी एखादी लबाडी करील; याप्रमाणें होतां होतां तो दुर्गुणांचा पुतळा बनून जाईल! त्याला संगति वाईट मनुष्यांचीच लागेल, व यामुळें त्याचा सारा जन्म फुकट जाईल! तेव्हां सद्गुणांपासून

सद्गुण वाढतात व दुर्गुणांपासून दुर्गुण वाढतात हें उघड आहे.

(३) एका बाईचा मुलगा, लहानपणीं लहान लहान चोऱ्या करीत असे, व संवयीनें तोच पुढें दरोडेखोर बनला. हें **इसापनी**तींतील उदाहरण सर्वांस ठाऊक आहे. हा त्याचा दुर्गुण वाढण्यास त्याच्या आईची संगति कारण झाली.

जार्जवाशिंग्टन पहिल्यापासून खरें बोलणारा होता. त्याच्या त्या सद्गुणास बापानें उत्तेजन दिल्यामुळें, तो उत्तरोत्तर सद्गुणी होत गेला, व **अमेरिका** खंडामध्यें मोठ्या योग्यतेस चढला, हें चांगल्या संगतीच्या परिणामाचें उत्कृष्ठ उदाहरण आहे.

वाल्या कोळ्याला **नारदा**ची संगति घडली, यामुळें तो **वाल्मिकऋषि** झाला, व **रामायणा**सारखा प्रसिद्ध ग्रंथ लिहिण्याची त्याला शक्ति आली. **विश्वामित्रा**सारखा **राजर्षि**, परंतु त्याला अप्सरेची संगति घडल्यामुळें त्याची सर्व तपश्चर्या फुकट गेली, व त्याचा लोकांत दुर्लौकिक झाला.

शिवाजीचा मुलगा **संभाजी** यास काय कमी होतें ! परंतु त्यानें **कलुशा**ची संगति धरली, यामुळें त्याचा नाश झाला, तो दुर्व्यसनी बनला व अखेर शत्रूच्या हातानें दुःसह कष्ट सोसून प्राणास मुकला !

(४) याकरितां मोठमोठ्या विद्वानांचा—संगतीवर—मोठा कटाक्ष असतो. ते एखाद्या मनुष्याची चौकशी करण्याच्या आधीं, त्याला संगति कोणाची आहे, याची चौकशी करितात. **सालोमन** यानें असें ह्मटलें आहे

कीं, जो शहाण्यांच्या संगतीनें वागतो, तो शहाणा होतो; परंतु जो मूर्खांच्या संगतीनें वागतो, त्याचा नाश होतो.

वेगळाल्या प्रसंगीं आपण कसें वागावें, हें शहाणपपणानें समजतें. शहाणपण शहाण्यांच्या संगतीनें प्राप्त होतें. जसें शहाणपण असेल, त्याप्रमाणें संकटांतून बचाव होतो. संकटांतून बचाव झाला, ह्मणजे आपण त्यास सुदैव ह्मणतों. याकरितां शहाण्यांच्या संगतीनें शहाणपण शिकून, शहाणें होण्याचा आपण यत्न करावा, ह्मणजे आपण सुदैवी होऊं. शहाणपण **हें दैवाचें पोशिंदें आहे**, व तें आपल्यास संगतीनें मिळावयाचें आहे.

विषाचें अमृत, व अमृताचें विष, करण्याची शक्ति ज्ञानाच्या स्वाधीन आहे. तें ज्ञान संगतीवर अवलंबून आहे; याकरितां संगति हें दैवाचें जीवित आहे, असें ह्मटलें तरी चालेल. तेव्हां संगतीचा नशीबाशीं किती संबंध आहे, हें यावरून उघड झालें.

२ आतां उद्योगाचा संबंध दैवाशीं किती आहे, तो पाहूं.

(१) लोक दैववान् कोणाला ह्मणतात, हें पाहूं गेल्यास असें आढळेल कीं, ज्याच्याजवळ पुष्कळ पैसा आहे; संतति विपुल आहे, व ती निरोगी आहे; ज्याची शरीरसंपत्ति चांगली आहे, व ज्याला कांहीं करावें लागत नाहीं; तो दैववान्.

(२) यावरून पाहिल्यास दैवाच्या कल्पनेंतच कांहीं अर्थ नाहीं. कारण सृष्टींतील घडामोडींकडे लक्ष दिल्यास प्रत्येक गोष्टींत बदल होणें हें अगदीं स्वाभाविक आहे, असें दिसतें.

पावसाळ्यांत नद्या दुथडी भरून धांवूं लागतात, व उन्हाळ्यांत कोरड्या ठणठणीत होतात! पावसाळ्यांत जिकडे तिकडे हिरवेंगार गवत उत्पन्न होतें, उन्हाळ्यांत तें मरून जाऊन जिकडे तिकडे रखरखीत होऊन जातें! एखादी जागा इमारतींनीं भरून जाते, तर दुसरी रिकामी पडते! एखादें नवें बंदर तयार होतें, तर दुसरें त्यांत वाळू भरून, निरुपयोगी होतें. एकाच मनुष्याच्या आयुःक्रमांत पाहिलें, तरी त्याचे कांहीं दिवस सुखाचे जातात, तों कांहीं दिवस दुःखाचे पुढें सरसावतात! जो मोठ्या ऐटीनें कांहीं दिवस तारुण्याच्या भरांत हिंडत असतो, त्याची ती ऐट सारी कांहीं काळानें वृद्धापकाळामुळें अगदीं नाहींशी होऊन जाते! **'सुखस्यानंतरं दुःखं, दुःखस्यानंतरं सुखं,'** किंवा **'दिना मागुनी सत्वरी रात्र येई, सरे रात्र तों मागुता दीस येई,'** असें हें सृष्टीचें रहाटगाडगें एकसारखें चालू आहे. यांत एकसारखें सुख कोणासही असणार नाहीं. एकसारखा दैववान् कोणीही मिळणार नाहीं. तेव्हां सुदैवी व दुर्दैवी या ह्मणण्यांत अर्थ काय राहिला! प्रत्येक मनुष्यास दोन्ही स्थितींचा अनुभव घेतलाच पाहिजे.

(३) आतां उद्योगानें मात्र आपल्यास या स्थित्यंतरांत थोडें तरी अंतर पाडितां येईल, कसें तें पहा. उन्हाळ्यांत नद्यांचें पाणी आटावयाचें तर खरेंच, परंतु धरण वगैरे बांधून त्याचा सांठा केल्यास तें लौकर आटावयाचें नाहीं. उन्हाळ्यांत जिकडे तिकडे रखरखीत तर होणारच, परंतु उद्योग केल्यास त्यांतील थोडासा तरी भाग आपल्यास हिरवागार राखतां येईल. रिकामी पडलेली जागा, उद्योग केल्यास

इमारतींनीं भरून जाईल. वाळूनें भरून गेलेलें बंदर, उद्योगानें फिरून सुंदर बंदर करितां येईल. मिसरदेशांत पावसाळा कसा तो माहीत नव्हता, परंतु उद्योगी लोकांनीं तेथें झाडें लावण्याचा क्रम सुरू केल्यापासून, त्यांस थोडथोडी पावसाळ्याची ओळख होऊं लागली आहे. मनुष्याच्या आयुःक्रमांत घडणाऱ्या गोष्टी सुद्धां केव्हां तरी घडणार हें खरें, तरी उद्योग करून योग्य व्यवस्था राखल्यास, आपल्यास त्या कालावधीवर लोटतां येतात. आपण पाण्यांत जहाज लोटल्यावर तें केव्हां तरी तडीस लागेल हें खरें, पण उद्योग केल्याशिवाय इच्छिलेल्या तडीस लागणार नाहीं. प्रतिकूळ वारा वाहूं लागल्यास तर उद्योगाशिवाय चालणारच नाहीं. तें भलत्याच दिशेस धांव घेईल. उद्योग करून वाऱ्याच्या वेगाशीं टक्कर मारल्यास, इच्छिलेल्या दिशेला जाईल. सुरक्षितपणानें कांठाला लागल्यावर, तुह्मी त्याला सुदैव ह्मणा, किंवा उद्योगाचें फळ ह्मणा.

(४) बरें, लोक ज्याला दैववान् ह्मणतात, असें वर ह्मटलें आहे, त्यांतील प्रत्येक वाक्याचा नीट विचार केला, तरीही असेंच दिसून येईल कीं, उद्योगाशिवाय सुदैव नाहीं. ज्याच्याजवळ पुष्कळ पैसा आहे, तो दैववान्. पण पुष्कळ पैसा मिळणार कसा ! उद्योगाशिवाय कधींही मिळावयाचा नाहीं. बरें मिळाला तरी जवळ रहाण्याचा संभव नाहीं. निढळाच्या घामानें पैसा मिळविला पाहिजे, त्याचा हात राखून खर्च केला पाहिजे, कवडी कवडी जोडून तो सांठविला पाहिजे, तेव्हां द्रव्यवान् हें पद आपल्यास प्राप्त होईल. मधमाशी एक-

एका फुलांतून, एक एक ठिपका आणून, ज्याप्रमाणें मधाचें पोळें तयार करिते, त्याप्रमाणें हजार उद्योग करून, जेव्हां पैसा पैसा करून रुपया जमवावा, तेव्हां द्रव्याचा संग्रह होतो. मधमाशीसारखा उद्योग केल्याशिवाय तो व्हावयाचा नाहीं. तेव्हां धनवान् होऊन दैववान् ह्मणवून घ्यावयाचें असेल, तर उद्योगाची कांस दृढ धरल्याशिवाय गत्यंतर नाहीं, हें उघड झालें.

ज्याला संतति विपुल आहे, व ती निरोगी आहे, तो दैववान्. कुळंबी, कातकरी, वगैरे जे श्रम करणारे लोक आहेत, त्यांची संततीबद्दल कधीं कुरकुर नसते, त्यांची संतति कधीं जरत्कारूही आढळत नाहीं. यावरून संतति विपुल व सशक्त होण्यासही उद्योग कारण आहे, हें लक्षांत येईल. खाण्यापिण्याला पुष्कळ असलें, व व्यायाम नसला; ह्मणजे शरीर वाऱ्याच्या मोटेसारखें फुगत जातें, व तें संतत्युत्पादनास निरुपयोगी होतें. वाणी, भाट्ये, वगैरे लोक जे व्यायामाची फारशी काळजी बाळगीत नाहींत, व ज्यांच्या स्त्रियांस व्यायामाची गरज पडत नाहीं, त्यांच्यामध्यें संततीचा अभाव, व विकलांग किंवा क्षीण संतति, पुष्कळ वेळां आढळते. डाक्टर लोकांस, व्यायाम करणें हेंच उत्तम औषध, असें वारंवार अशा लोकांस सांगण्याची पाळी येते. सृष्टीचे नियम पाळावयाचे नाहींत, मनमानेल तसें वागावयाचें, असा क्रम चालू असला, ह्मणजे प्रकृति सहज खराब होते. मग संतति पाप्याच्या पितरांसारखी झाली, ह्मणून नवल काय! वेश्यांस संतति बहुशः नसते, हीही गोष्ट या ठिकाणीं लक्षांत ठेवण्यासारखी आहे. स्वतःची शरीरप्र-

कृति चांगली रहावी, अशी जर आपली इच्छा असली, तर नुसतें चांगलें खावयास कसें मिळेल, एवढीच इच्छा आपण करूं नये; तर तें आपल्यास पचेल कसें याचाही विचार करावा. चांगलें खावयास मिळणें जेवढें महत्वाचें आहे, तेवढेंच त्याचें पचन होणें हें अगत्याचें आहे. याकरितां जें खावयास मिळेल, त्याचें पचन होण्यापुरता तरी आपण व्यांयाम केला पाहिजे. नाहीं तर–जळजळीत निखाऱ्यांवर भारी जळवण घातलें, ह्मणजे जसा तो अग्नि प्रदीप्त न होतां विझण्याच्या मार्गास लागतो, त्याप्रमाणें–तें अन्न आपल्या जठराग्नीस प्रदीप्त न करितां, विझवण्याच्या तजविजीस लागेल, व त्यापासून आपल्या शरीरप्रकृतीस अपाय होईल. ज्याला कांहीं करावें लागत नाहीं, तो दैववान्. या ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. ज्याला कांहीं करावयास नको, त्यानें मनुष्यजन्मास यावें कशाला ! दगड, पर्वत, हे या व्याख्येप्रमाणें पहातां मोठे दैववान् समजावयाचे !

(९) ही दैववान् होण्याची कल्पना, ह्मणजे दुर्दैवी होण्याच्या कल्पनेसारखी आहे. या कल्पनेनें आमच्यांतील पुष्कळ लोकांचा नाश झाला आहे व होत आहे. ज्यांच्या घरांत श्रीमंती–ताटावरून पाटावर व पाटावरून ताटावर–अशा मासल्याची असते, त्यांच्यांत अवसान अगदींच मिळावयाचें नाहीं. उशाशीं व पायांशीं चाकर असल्यामुळें, त्यांच्या पोटांतलें पाणी हालावयाचें नाहीं. आंगरखा घालण्यास व काढण्यासही चाकर असल्यामुळें, त्यांचे हातपाय बहुतेक ताठून गेलेले असावयाचे ! त्यांना वाहून नेण्याला गाड्या तयार असल्यामुळें, त्यांचे पाय

शरीराचें ओझें तोलण्यास मात्र समर्थ असावयाचे! चालून जाण्याचें काम कधीं त्यांच्या स्वप्नांतही नसल्यामुळें एक कोसभर पायीं जाण्याचा प्रसंग आल्यास, रावसाहेबांस चारवेळ विश्रांति घेण्याची, व हायहुश करीत बसण्याची वेळ यावयाची! काय ही श्रीमंती व काय हा थाट! ईश्वरानें दिलेल्या अवयवांच्या शक्तीचा तिरस्कार करावयाचा, व शिपायांच्या खांद्यावर हात टाकून चालण्यांत वैभव मानावयाचें! असें झालें ह्मणजे सर्व अवयव हलके हलके आपलीं कामें विसरतात, व श्रीमंतांस त्यांची श्रीमंती भोगण्यास एकटे सोडून चालते होतात! मग काय विचारतां! पायांनीं चालवत नाहीं, हातापायांत कळा येतात, उन्हाची तिरीप सोसत नाहीं, अशी सुखाची अगदीं परमावधि होऊन जाते! त्यांची संतति तर—गर्भश्रीमंत असल्यामुळें—त्यांच्यापेक्षां सवाई लक्षणांनीं युक्त असावयाची! हें फळ कशाचें? कांहीं करावयास नको याचें! याकरितां ज्याला खरें सुख पाहिजे असेल, त्यानें असल्या वेडगळ समजुतींवर भरंवसा न ठेवितां, उद्योगानें आपलें शरीर साफ ठेवीत जावें; व्यायामानें आपले अवयव सशक्त करीत असावें; आळसाचा जंग आपल्या शरीरावर चढूं देऊं नये; ह्मणजे सर्व सुखांचा उपभोग त्यास घेतां येईल, व तो चिरकाल दैववान् राहील.

(६) आतां उद्योगाशिवाय प्राप्त झालेलें सुदैव दुर्दैव कसें होतें, याचा थोडासा विचार करूं.

उद्योगाशिवाय जर आपल्यास पैसा मिळाला, तर तो आपल्यास श्रम केल्याशिवाय मिळाला असल्यामुळें, त्याची

जेवढी किंमत आपल्यास वाटावयास पाहिजे, तेवढी वाटत नाहीं. यामुळें त्याचा खर्च करतांना मनांत विचार रहात नाहीं. तो संपल्याशिवाय डोळे उघडत नाहींत. मग डोळे उघडले तरी त्याचा उपयोग नसतो. निढळाच्या घामानें मिळवलेल्या द्रव्याचें असें होत नाहीं. **'थेंबें थेंबें तळें सांचे'** या ह्मणीप्रमाणें त्यांत उत्तरोत्तर भर पडत जाते. त्यांत कमतरपणा येण्याचा संभव नसतो. आपण जो पदार्थ कष्टानें मिळवितों, त्याला आपण अधिक जपतों. श्रम करून जो मिळवणारा आहे, त्याला पैसा कसा मिळतो, (कोणत्या प्रकारें मिळावावा लागतो) हें चांगलें समजतें, ह्मणून त्याच्या हातून रिकामा खर्च होत नाहीं. त्यास कोणतेंही दुर्व्यसन नसतें, यामुळें त्याचा संग्रह वाढत जातो. दैववानाची गोष्ट यापेक्षां वेगळी असते. त्याला पैसा मिळतो आयता. त्याच्याकरितां त्याला श्रम पडलेले नसतात. यामुळें **'हपापाचा माल गपापा गेला'** या ह्मणीप्रमाणें त्याचा पैसा खर्चून जातो, तोही दुर्गुणांत, कारण सद्गुणांची व त्याची (दैववानाची) ओळख नसते. यामुळें पैशापरी पैसा जाऊन त्याच्या शरीराची अगदीं खराबी होते. त्याला अनेक रोग जडतात. दुर्दैव त्याच्या पाठीस हात धुवून लागतें, व त्यामुळें असें वाटतें कीं, हें सुदैव त्यास प्राप्त झालें नसतें, तरी बरें झालें असतें! यावरून काय झालें, कीं दैवानें त्याला मिळालें होतें असें ह्मटलें, तरी तें राखावें कसें, त्याचा उपयोग करावा कसा, हें त्याला कांहीं ठाऊक नसल्यामुळें **"दैव देतें व कर्म नेतें"** अशी त्याची अवस्था झाली. त्यानें पूर्वी उद्योग केला अ-

सता, आणि उद्योगापासून ज्ञान संपादिलें असतें, तर दैवाच्या अनुकूलतेनें सर्व चांगलें झालें असतें; परंतु ज्ञानाभावामुळें तें सर्व व्यर्थ गेलें. तेव्हां नुसतें दैव अनुकूळ होऊन कांहीं उपयोग होत नाहीं. त्याला उद्योगाचें साहाय्य पाहिजे. नाहीं तर दैव पंगू, तशी त्याची अनुकूलताही पंगूच ! यावरून दैवाचा संगतीशीं व उद्योगाशीं किती संबंध आहे, हें कळून येईल.

७ नशीबावर किती अवलंबून रहावें?

१ **'नशीब हें बाजारभावासारखें आहे'** असें एका इंग्रज ग्रंथकारानें ह्मटलें आहे. बाजारभाव जसा क्षणोक्षणीं बदलतो, व तो बहुधा कमी होतो, एखादे वेळेस मात्र वाढतो; त्याप्रमाणेंच नशीबावर अवलंबून राहिलें असतां, पुष्कळ वेळां तेवढाच लाभ होतो, किंवा कमी होतो; एखादे वेळेस मात्र अधिक होण्याचा संभव असतो. याकरितां नशीबावर अवलंबून रहाणें चांगलें नाहीं. उद्योगाला एखाद्या वेळेस मात्र फळ येणार नाहीं, परंतु दैवाचें पांगळेपण एकसारखें कायम असतें.

२ **रामदासांनीं** असें ह्मटलें आहे कीं, दैव हें घोड्यासारखें आहे, व उद्योग हा स्वारासारखा आहे. तेव्हां उद्योगस्वार आपली लगाम जशी खेंचील, तसा दैवरूपी घोडा उडेल. स्वारानें आपल्या घोड्यावर भिस्त न ठेवतां, आपल्याला वाटेल त्याप्रमाणें त्यास फिरावयास लावलें पाहिजे. स्वार जर घोड्याच्या स्वाधीन झाला, तर त्याच्यानें लढाई मारवणार नाहीं. आतां मुळीं घोडाच नसला, तर

स्वार काय करील ? ही शंका कांहीं खोटी नाहीं, तरी स्वार जें करील, तें घोड्याच्यानें होणार नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. **'सहाय असिला असे तरिच शत्रुला मारवे.'** उत्तम प्रकारची तरवार असली, ह्मणून स्वतः तरवारीच्या आंगांत शत्रूला मारण्याची ताकद नाहीं. तिला कोणी तरी साह्य करणारा पाहिजे. तीच गोष्ट नशीबाची आहे. आंधळ्या माणसानें इतरांस वाट ती काय दाखवावी ! पांगळ्यानें दुसऱ्याचे चालण्याचे श्रम ते कसे वांचवावे ! त्याचप्रमाणें जें आहे किंवा नाहीं याचीच भ्रांति आहे, किंवा केवळ परिणामावरून ज्याचें अस्तित्व अटकळीनें मानावयाचें आहे, त्याच्या लगामीं लागून आपलें चालावें कसें ! जें कोणत्याच जागीं स्थिर असें आपल्यास आढळत नाहीं, जें अज्ञान्याला जेवढें जवळ किंवा खरें वाटतें, व ज्ञान्याला तेवढेंच लांब किंवा खोटें वाटतें, त्याच्यावर आमचा भरंवसा बेताचाच असेल तितका बरा; नसेल तर फार उत्तम. उद्योग करून जर फळ मिळालें नाहीं, तर— **'यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः'**—(यत्न करून जर कार्य सिद्ध झालें नाहीं तर त्यांत दोष कोणता !) समाधानाकरितां पाहिजे तर दैव मानावें. यापेक्षां त्याचा उपयोग काडीइतकाही नाहीं.

३ या जगांत दैववादी लोकांचा भरणा जर फार असता, तर या जगाची हल्लीं जी स्थिति आहे, त्यापेक्षां फार वेगळ्या प्रकारची ती असती. शेतकीचीं आउतें, वस्त्रें करण्याचे माग, आगगाड्या, आगबोटी, वगैरे प्रवासाचीं साधनें, हीं दैवानें उत्पन्न झालेलीं नाहींत. फ-

ळेंमुळें मिळतील तीं खावीं; नागवेंउघडें हिंडावें, पावसांत, उन्हांत, थंडींत रहावें; पावसाचा कंटाळा आल्यास गुहेंत शिरावें; थंडी फार वाजूं लागल्यास हात उराशीं धरावे; नाहीं तर अगटीशीं सोय लावावी; उन्हाचा त्रास आल्यावर झाडींत शिरावें; अशा प्रकारें कष्टप्रद आयुष्य मनुष्यजातीस कंठावें लागलें असतें. '**अमेरिकन इन्दियन** लोक, **काफरी** लोक, **एस्कीमोज**, इत्यादि लोकांची स्थिति अशा प्रकारची आहे. तेव्हां दैवावर किती विश्वास ठेवावा, हें यावरून लक्षांत येईल. आपण दैवावर विश्वास ठेवला, व '**नशीबांत असेल तसें घडेल,**' या मंत्राचा जप करीत बसलों, तर दुनियेंतील एकून एक सद्गुण नष्ट झाले ह्मणून समजावें. कारण मग उद्योगाची गरज राहिली नाहीं; उद्योगाची गरज नाहीं, असें ह्मटलें, ह्मणजे आत्मसंयमन, धारिष्ट, भूतदया, धैर्य, शौर्य, वगैरे पराक्रमांचें (गुणांचें) करावयाचें काय, व ते असल्याबद्दल स्तुति कोणाची करावयाची ! जें काय व्हावयाचें तें नशीबानें होईल. मग तें अमक्यानें केलें, हें ह्मणण्यांत प्रतिष्ठा ती कसली !

शिकंदरबादशहानें अनेक देश जिंकले, त्याचें नशीबच थोर ! **भाऊसाहेब पानपत**च्या लढाईत मरण पावला, त्याच्या नशीबींच तसें होतें ! **नारायणराव** पेशव्यास **गारद्यांनीं** ठार मारलें,बेटा दुर्दैवीच तो ! दुसऱ्या **बाजीरावाच्या** कारकीर्दीत ब्राह्मणांस पक्वान्नांची रेळचेळ झाली होती, बिचाऱ्यांचें दैव उदयास आलें होतें ! (उदरीं शनि आला होता !) **द्रौपदीनें** आपलें पातिव्रत्य राखलें, **कर्णानें** कधीं कोणास '**देत नाहीं**' असें ह्म-

टलें नाहीं, **हरिश्चंद्र** आपल्या सत्वास जागला, नशीब अनुकूळ होतें ह्मणून. दुसऱ्या **बाजीरावानें** पेशवाई गमावली व **संभाजी औरंगजेबाच्या** हातून मरण पावला, नशीब प्रतिकूळ झालें ह्मणून! याप्रमाणें एकदां नशीबाचा जयघोष चालू झाला, ह्मणजे कांहीं करावयास नको, खुशाल हातावर हात व पायावर पाय टाकून स्वस्थ बसावें, सर्व सद्गुणांना रजा द्यावी, कोणाला वाईट ह्मणावयास नको, व कोणाला चांगलें ह्मणावयास नको! परंतु या कोट्यांचा कांहींएक उपयोग नाहीं. दैव असलें तरी तें पंगूच. त्याच्यावर विश्वास ठेवणें चांगलें नाहीं. हें, ज्याला ह्मणून आपलें कल्याण करून घ्यावयाचें असेल, त्यानें पक्कें लक्षांत ठेवावें.

८ उद्योगावर किती विश्वास ठेवावा?

१ '**पुष्कळ पैसा असावा, व कांहीं करावें लागूं नये**' ही सुखाची परमावधि, हा समज चुकीचा आहे, हें मागें दाखविलेंच आहे. कारण '**पुष्कळ पैसा असावा**' पुष्कळ ह्मणजे किती? अरेबियननाइट्ससमधील गोष्टींप्रमाणें! मोठमोठे धनाढ्य लोक,—कीं ज्यांची संपत्ति पिढ्यानुपिढ्या पुरली असती; त्यांचीही ती, पुढील प्रजा कांहीं न करणारी झाल्यामुळें, लयास गेली आहे. '**शिकवलेली विद्या** (सांगितलेली अक्कल) व **बांधलेली** शिदोरी, ती किती दिवस पुरणार! सांठवलेलें पाणी फार दिवस टिकत नाहीं, व पुरतही नाहीं. तीच गोष्ट संपत्तीसही लागू आहे. निवळ खर्च करणारास कुबेराची संपत्तिही पुरणार नाहीं. तेव्हां तात्पर्य इतकेंच कीं,

कितीही संपत्ति असो,—जो उद्योगानें तींत भर टाकणार नाहीं, त्याची—ती लयास गेल्याशिवाय रहाणार नाही. ही झाली संपत्तीची गोष्ट. आतां '**कांहीं करावें लागूं नये**' हें तर ह्मणणें केवळ फोल आहे, हें मागें दाखविलेंच आहे. गीतेंत असें ह्मटलें आहे कीं—'**नहि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्**' कोणत्याही प्राण्याला कोणत्याही वेळीं रिकामें बसवत नाहीं. तो काम न करितां रिकामा बसला, तर त्याचें मन वावरूं लागेल. व एकदां मन वावरूं लागलें, ह्मणजे त्याची गति वाऱ्यापेक्षांही अधिक असल्यामुळें, तें काय, जाईल तिकडे जाईल! एका इंग्लिश ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे कीं, '**रिकाम्या मनांत सैतान आपलें घर करितो**' याचा अर्थ असा समजावयाचा, कीं मन रिकामें राहिलें ह्मणजे त्याची दुराचरणाकडे प्रवृत्ति होते; तें इंद्रियांना आपल्या अनावर इच्छा तृप्त करण्याला मदत घेतें, यामुळें मनुष्य हळू हळू पक्का दुर्व्यसनी बनत जातो व आपल्या आयुष्याचा नाश करून घेतो! ह्या अनर्थापासून सुटका करून घेण्याचा मार्ग—आपल्याला नेहमीं उद्योगांत गुंतवून ठेवणें हा—काय तो एक आहे. आपला वेळ उद्योगांत गेला व रिकामा वेळ आपल्यास मिळाला नाहीं, ह्मणजे आपलें मन कोणत्याही दुर्व्यसनांत गुंतणार नाहीं व त्यापासून आपलें जन्माचें हित होईल. मनुष्यास सुख कोणत्याही एका गोष्टींत नाहीं. त्यास उद्योगांत सुख आहे ह्मणावें, तर त्यास विश्रांतीची गरज लागते. विश्रांतींत सुख आहे ह्मणावें, तर रिकामें बसून त्याचा वेळ जात नाहीं. वेळ गेला, तर तो मनुष्य आळशी व निरु-

पयोगी होऊन जातो. पोट भरलेल्या मनुष्यापुढें पंचपक्वान्नें ठेविलीं, तरी तीं त्याला कडू लागतात. जो दिवसभर श्रम करतो, तो रात्रीं एका घोंगडीच्या रकट्यावरही सुखानें निजतो, पण जो दिवसभर आळशासारखा लोळत पडतो, त्यास रात्रीं मऊ गादीवर सुद्धां झोंप लागत नाहीं! यावरून सुख कोणत्याही एका गोष्टींत नाहीं, हें लक्षांत येईल. खरें सुख रिकामें बसण्यांत नाहीं, तर चांगला उद्योग करण्यांत आहे, हें लक्षांत ठेवावें.

उद्योग हा आपला बंधु होय. उद्योगाशिवाय कांहीं व्हावयाचें नाहीं. ओसाड जागांवर रमणीय बाग उद्योगानें होतात, भयाण जागांवर सुंदर मंदिरें उद्योगानें उठतात, व अफाट दर्यावर अनेक तारवें उद्योगानें चालतात. उद्योगाशिवाय आपले हातपाय आपल्या स्वाधीन रहात नाहींत व ते उद्योगाशिवाय सशक्त होत नाहींत. उद्योगाशिवाय सृष्टींतील कोणतेंही कार्य होत नाहीं. सृष्ट पदार्थांच्या शक्ति उद्योगाशिवाय कळत नाहींत, त्यांचा उपयोग उद्योगाशिवाय करतां येत नाहीं. अन्न, वस्त्र, इत्यादि निर्वाहाचे पदार्थ, आपल्यास उद्योगाशिवाय प्राप्त होत नाहींत. उद्योगाशिवाय देश संपन्न होत नाहीं, राष्ट्र बनत नाहीं, तें टिकत नाहीं, व त्याची भरभराट होत नाहीं. यावरून उद्योगाचें महत्व लक्षांत येईल.

२ **लार्ड डर्बीसाहेब** असें ह्मणतात कीं, कितीही भला किंवा अब्रूचा मनुष्य असो, तो जर निरुद्योगी असला, तर तो खरा सुखी असणार नाहीं. उद्योगी मनुष्यास जें समाधान आहे, तें आळशी मनुष्यास नाहीं. तो आपल्या असलेल्या स्थितींतच लोळत पडलेला असतो. एका

इंग्लिश ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे कीं 'ज्याप्रमाणें डबक्यांत उत्तरोत्तर किडे मात्र वाढत जातात, त्याप्रमाणें आळशी मनुष्याच्या मनांत वाईट विचार मात्र वाढत जातात.' **स्माइल्स** असें ह्मणतो कीं "आळस मनुष्याचें किंवा देशाचें काळीज खाऊन टाकतो. जंग लोखंडाचा नाश करतो, त्याप्रमाणें आळस मनुष्याचा किंवा देशाचा नाश करतो." दैववादी बनणें ह्मणजे आळशी होणें आहे. याकरितां दैववादी बनून आळशी होऊन, आपलें, आपल्या देशाचें, अकल्याण कोणींही करून घेऊं नये. आळसाच्या योगानें फार तोटे होतात.

हल्लीं ज्याप्रमाणें **इंग्रजांचें** राज्य चोंहींकडे चाललें आहे, तसेंच पूर्वीं **रोमन** लोकांचें राज्य चोंहींकडे पसरलें होतें. जोंपर्यंत त्या राष्ट्रांत उद्योगी लोक होते, तोंपर्यंत तें व्यवस्थित चाललें होतें. परंतु जेव्हां ते लोक उत्तरोत्तर चैनी होत चालले, त्यांस उद्योगाचा कंटाळा आला, ज्या त्या कामावर गुलामांची योजना होऊं लागली; तेव्हां त्यांचें अफाट राष्ट्र लयास गेलें. **हिंदुस्थानां**तील **मोंगलाई, मराठेशाई** व **पेशवाई**, याच कारणानें लयास गेल्या.

२ पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांची शर्यत हल्लीं लागली आहे. आपलें राष्ट्र दैवयोगानें शेवटल्या पायरीवर जाऊन बसलें आहे. जें तें राष्ट्र आपण पुढें घुसण्याचा व दुसऱ्यास मागें ढकलण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा वेळीं आपण जर आळशी झालों,–कांहीं हालचाल केली नाहीं,–तर पुढें सरण्याची आशा आपल्यास करावयासच नको! आपण प्रयत्नवादी बनून, धांवणाऱ्या राष्ट्रांबरोबर धांव-

ण्याचा, व सवड सांपडतांच पुढें घुसण्याचा निश्चय केला पाहिजे, तर या राष्ट्रीय शर्यतींत आपला निभाव लागेल, नाहीं तर लौकरच नामशेष होण्याचा प्रसंग येईल! **युरोपियन** लोकांपासून आपल्यास दुसरें कांहीं शिकावयाचें नाहीं. जें कांहीं शिकावयाचें आहे तें हेंच—**त्यांचा उद्योगीपणा**—हा त्यांचा गुण किती अनुकरणीय आहे, हें सांगावें तेवढें थोडेंच.

युरोपांतील लोकांनीं अनेक तऱ्हेचीं यंत्रें काढिलीं आणि आमच्या हस्तकौशल्यास मागें सारिलें तें कशानें? **उद्योगानें**. आह्मीं आपल्या सुवर्णभूमीस आळसानें दरिद्रदशेस आणिलें, व **इंग्लिशांनीं** आपल्या रानवट देशास उद्योगानें श्रीमंत करून सोडलें. तिकडील पदार्थसंग्रहालयें, पुस्तकालयें, विश्वविद्यालयें, इत्यादिकांचें वर्णन जेव्हां आह्मी वाचतों, तेव्हां आह्मांस आमच्या **भारतां**तील **मयसभे**ची आठवण होते! हें आमचें वैभव गेलें कशानें व त्यांच्या देशांत भरलें कशानें? आमच्या आळसानें व त्यांच्या उद्योगानें. **अमेरिकन** लोकांनीं आपल्या अचाट उद्योगानें **अमेरिका**खंडास इंग्लंडच्याही पुढें नेलें आहे. **आस्त्रेलेशिआ**मधील **आस्त्रेलिआ** हें खंड, नुकतें ओसाड होतें. त्यांत **युरोपियन** लोकांनीं वसाहत करून, आपल्या अचाट उद्योगानें तेथें नवी **अमेरिका** बनविण्याचा बेत आणला आहे! त्यांच्यांत उद्योगीपणा किती भरला आहे, हें दाखविण्याकरितां त्यांच्या अचाट उद्योगाचें एक उदाहरण येथें लिहितों.

युरोपच्या मधोमध **आल्प्स**नामक पर्वतांची रांग लांबचलांब पसरलेली आहे. हिजपैकीं **मान्टसेनिस** या डों-

गराला एक तीन कोसांचा बोगदा आगगाडीकरितां पाडलेला आहे. त्याचें काम सन १८५८ त सुरू होऊन सन १८७१ त समाप्त झालें. कांहीं मंडळी **फ्रान्साकडून** व कांहीं **इतालीकडून** डोंगर पोखरायास लागली. असें होतां होतां तेरा वर्षांनीं पर्वताच्या पोटांत त्यांची परस्पर भेट झाली! किती दीर्घ हा उद्योग! यावरून कोणतेंही महत्कृत्य दीर्घोद्योगाशिवाय सिद्धीस जात नाहीं, हें लक्षांत येईल.

४ आमचे पूर्वज असेच दीर्घोद्योगी होते. आज मात्र तो गुण आमच्यांतून नष्ट झाल्यासारखा झाला आहे. आज पर्वताला बोगदे पाडण्याच्या कामाची—उंदीरघुशींच्या कामाची!—आह्मी मोठी तारीफ करतों. परंतु पूर्वी यापेक्षां अधिक कुशलता ज्यांत आहे, अशीं कामें आमच्या पूर्वजांनीं करून ठेविलीं आहेत. **घारापुरी** येथील कोरींवलेणीं,—तेथील भव्य **त्रिमूर्ति**, व अनेक **शिव**चरित्रांचे देखावे, ज्यांच्या गुडघ्याशीं हल्लींचीं माणसें लागतात, असे विशाळ द्वारपाळ;—**वेरूळ** येथील अप्रतिम लेणीं; **अजिंठा** येथील डोंगरांतील छतावरचें अपूर्व काम; कीं जें करण्याची साधारण कारागिराची छातीच नाहीं; कारण समोरच्या भिंतीवर कुशलतेचें काम कोणी करील, परंतु छतावरील काम उताणें निजून केल्याशिवाय व्हावयाचें नाहीं;—इत्यादि कामें पाहिल्यावर आपले पूर्वज किती कुशल होते व किती उद्योगी होते, याबद्दल खातरी झाल्याशिवाय रहाणार नाहीं. त्यांचें कौशल्य एकाच कामांत होतें असें नाहीं, सर्व कामांत होतें. पूर्वीचें ग्रंथभांडार पाहिल्यावर या गोष्टीची प्रतीति को-

जेवढें अगत्याचें आहे, तेवढेंच त्याचा हात राखून खर्च करणेंही अगत्याचें आहे. आपल्या लोकांत श्रमविमुखता वाढत चालली आहे. ही अशीच वाढूं दिल्यास तिच्यापासून आपल्या लोकांचा, त्यांच्या कुटुंबांचा, व सर्व देशाचा, नाश झाल्याशिवाय रहाणार नाहीं. आमचे लोक पांच रुपयांची नोकरी करण्यास तयार होतात; परंतु एखादा धंदा आंगावर घेऊन करण्यास तयार होत नाहींत; हें मोठें आश्चर्य आहे!

६ इंग्लिश लोकांत बडे लोक सुद्धां या दूषणापासून मुक्त असतात. प्रत्यक्ष **ग्लॉडस्टोन** साहेब, आपलें मुख्य प्रधानकीचें काम संभाळून, आपल्या बागेंतील झाडें तोडण्याचें काम करीत असतात. **रोमन बादशहा सेव्हेरस**, हा असें ह्मणत असे कीं, **'आपण मेहनत करूं या'** **सर वाल्टर स्काट** ह्मणत असे कीं, **'रिकामे राहूं नका.'** त्यानें आपल्या मुलास उपदेश केला, त्याचें तात्पर्य असें आहे. 'कोणत्याही स्थितींत आपण असलों, तरी आपल्यास श्रम केले पाहिजेत. श्रम केल्याशिवाय कोणतीही गोष्ट प्राप्त होणार नाहीं. श्रम केल्याशिवाय ज्ञान मिळणार नाहीं, त्याप्रमाणें श्रम केल्याशिवाय धान्य पिकणार नाहीं.' कोणत्याही प्रकारचे श्रम करण्यांत हलकेपणा नाहीं, हें मनुष्यानें लक्षांत ठेवलें पाहिजे. युरोपांतील बडे लोकांचे मुलगे कांहीं तरी स्वतंत्र धंदा शिकतात. **महाराणी**चा एक नातू छापण्याची कला शिकला आहे. **पिटर धि ग्रेट बादशाह**—आपल्या देशांतील लोकांस कलाकौशल्याचें ज्ञान व्हावें ह्मणून,—स्वतः **इंग्लंडांत** जाऊन शिकावयास राहिला होता; व तो सामान्य मजुराबरोबर

णासही येईल. हल्लींच्या आपल्या पडत्या काळीं आपण उद्योगाचीच कास धरली पाहिजे. त्याशिवाय आपली ऊर्जितदशा येण्याचा संभव नाहीं. याकरितां प्रत्येकानें उद्योगाची कास धरून, आपलें, आपल्या समाजाचें व आपल्या देशाचें, हित करण्यास झटावें.

९ आपल्या पूर्वजांस काम करण्यांत भूषण वाटत असे, परंतु हल्लींच्या लोकांस रिकामें बसण्यांतच भूषण वाटतें. पूर्वींचे ह्मातारे,—त्यांतील कित्येक अद्यापही आहेत,—आपल्या घरांतील कोणतेंही काम करण्यास लाजत नसत. ते झाडांना पाणी घालीत, लांकडें फोडीत, शेताच्या बंदिस्तीचें काम करीत; सकाळीं उठल्यावर चार चार कोसपर्यंत वसूलबाकीस पायांनीं जाऊन जेवायास परत येत. हल्लीं सर्व स्थिति याच्या उलट झाली आहे. कोणास काम करावयास नको. पोशागीपणा फार वाढला आहे. लांकडें फोडण्यासारखीं कामें तर राहोत; परंतु आपलीं धोतरें धुणें व बाजारांतून चार पैशांची भाजी हातांत आणणें, हें सुद्धां लोकांस लज्जास्पद वाटूं लागलें आहे. काय ही चमत्कारिक मिजास! जवळ पैसा नसला, तरी—लोक हंसतील ह्मणून,—संसाराचीं बारीकसारीक कामें सुद्धां मोलीं देण्याचा प्रघात वाढत चालला आहे! जें काम आपल्याला होत नसेल, तें मोलीं देण्यास हरकत नाहीं; परंतु आपल्याला काम होत असून, आपल्या हातापायांना शक्ति असून, रिकामें बसून, केवळ पोशागी बनून, आपलीं कामें मोलीं देऊन रिकामा खर्च वाढवण्यांत अर्थ काय? काम करण्यांत दूषण नाहीं, भूषण आहे. पैसा मिळवणें

बेलाशक काम करीत असे. आपण हाच कित्ता उचलला पाहिजे. उद्योगाचें साम्राज्य झाल्याशिवाय, राष्ट्राच्या भरभराटीची रिकामी आशा करण्यांत अर्थ नाहीं. याकरितां उद्योगावर विश्वास पूर्णपणें ठेवणें, हेंच सर्वांस श्रेयस्कर आहे, हें वरील प्रतिपादनावरून सर्वांच्या लक्षांत येईल.

९ परिसमाप्ति.

नशीब आणि उद्योग या निबंधाचें प्रतिपादन एथें संपलें. या निबंधाचा झोंक उद्योगाचें प्राधान्य ठरविण्याकडे आहे, हें वाचकांच्या ध्यानांत सामान्य निरूपणाच्या प्रसंगींच येऊन चुकलें असेल. तें तसेंच आहे. सर्व मनुष्यांस स्वातंत्र्य आवडत असतें. तें कां! याचा बराच विचार केल्यास असें आढळून येईल कीं, ज्याच्यांत कांहीं तरी कर्तबगारी ह्मणून आहे, त्याला एखादें काम आपण आपल्या हिमतीनें केलें, असें ह्मणण्यांत मोठी प्रतिष्ठा वाटते; व ती वाजवी आहे. कोणतेंही काम पूर्ण स्वातंत्र्यानें केल्याशिवाय मनासारखें करतां येत नाहीं; याचा अनुभव पुष्कळांस असेल. तेव्हां स्वातंत्र्याशिवाय आपली कर्तबगारी दाखवतां येत नाहीं; ह्मणून स्वातंत्र्य पाहिजे. तीच गोष्ट उद्योग व नशीब यांस लागू आहे. उद्योग करणारास जो लाभ होईल, तो त्याच्या कर्तबगारीचा जबरदस्त पुरावा असतो. नशीबाचें तसें नाहीं; ह्मणून त्यानें झालेल्या लाभास किंमतही नाहीं. आयत्या पिठावर रेघा ओढण्यांत भूषण नाहीं, तसेंच दैवानें मिळालेल्या संपत्तींत ऐट मारण्यांत अर्थ नाहीं. स्वतः उद्योग करावा;

येणाऱ्या विघ्नांस टक्कर देऊन त्यांतून पार पडावें; व सिंहाप्रमाणें स्वपराक्रमानें काय मिळेल तें मिळवावें; यांतच काय तें भूषण आहे. ह्मणून ज्याप्रमाणें कोणी **शंकराची** स्तुति करितात, कोणी **विष्णूची** करितात, परंतु एक कवि ह्मणतो कीं **'तथापि मामकी भक्तिश्चंद्रचूडेऽभिजायते,'** त्याप्रमाणें कोणी दैवाची थोरवी गावोत; व कोणी उद्योगाची तारीफ करोत; परंतु माझ्या मनाची भक्ति उद्योगावरच विशेष बसते !

१० पुनरवलोकन व प्रार्थना.

(१) असो. आतां ज्या विषयाचें वर प्रतिपादन केलें आहे, त्याचें थोडक्यांत पुनरवलोकन करूं. १ सामान्य विचार, यांत ज्ञानवृद्धि झाल्यामुळें विचारांत बदल कसा होतो, त्याचा वर्तनावर काय परिणाम घडतो, उद्योगानें पुढें सरलेल्या लोकांच्या उदाहरणांकडे दृष्टि दिल्यानें आपल्यास नवी उमेद कशी येते, हें सांगून नंतर दैवप्रधान व उद्योगप्रधान वाक्यें सांगितलीं आहेत. नशीब थोर कीं उद्योग थोर याचा एका दृष्टीनें निकाल करून उद्योगाचें महत्व वेगळाल्या गोष्टींनीं कसें स्थापन होतें हें सांगितलें आहे. नशीबावर भरंवसा ठेवल्यापासून कोणते अनर्थ उत्पन्न होतात हें सांगून, उद्योगावर भरंवसा ठेवणें चांगलें असें सिद्ध केलें आहे. २ नशीब ह्मणजे काय? यांत वेगळालीं उदाहरणें देऊन लोक 'नशीब' कशाला ह्मणतात, हें स्पष्ट करून दाखविलें आहे. त्यावरून नशीबाची कल्पना केवळ मनाचें समाधान करण्याकरितां आहे, असें दिसून येण्यासारखें आहे.

३ पर्यायवाचक शब्द, यांत 'नशीब' अशा अर्थी येणारे वेगळे वेगळे बरेच शब्द घेऊन त्यांचा व्यवहारांत कसा उपयोग होतो, त्यांत किती अर्थ आहे, हें साधकबाधक प्रमाणें घेऊन दाखविलें आहे; विपरीत काल कशाला ह्मणतात, त्यावेळीं कसें वागावें, दुर्दैवाची कल्पना जवळ आणणें किंवा लांब नेणें आपल्या कसें स्वाधीन आहे, हें दाखवून दैवाला दोष लावण्यांत कांहीं अर्थ नाहीं, हें स्पष्ट केलें आहे. ४ नशीबांत बदल होतो कीं काय? या प्रश्नाचा निकाल—'नशीबांत बदल होतो' पण तो उत्तम कोटींतल्या मनुष्यांकडून होतो, असें सिद्ध करून केला आहे. ५ होत असल्यास कशानें होतो? याचें उत्तर संगतीनें व उद्योगानें होतो, असें देऊन ह्या दोन्ही गोष्टी उदाहरणांनीं सिद्ध करून दाखविल्या आहेत. ६ संगति व उद्योग यांचा संबंध नशीबाशीं कितपत असतो? यांत संगतीनें मनुष्याच्या स्थितींत अंतर कसें पडतें, सद्गुणानें सद्गुण कसे वाढतात, हें दाखवून संगतीचा नशीबाशीं निकट संबंध आहे, असें दर्शविलें आहे; व उद्योगाचा संबंध दाखवितांना दैववान् कोणाला ह्मणतात, त्या ह्मणण्यांत किती अर्थ आहे, उद्योगाशिवाय दैववान् होणें शक्य आहे किंवा नाहीं, हें दाखवून उद्योगाशिवाय नशीबाचा कांहीं उपयोग नाहीं, असें सिद्ध केलें आहे. ७ नशीबावर किती अवलंबून राहावें? यांत नशीबाचा पांगळेपणा स्पष्ट दाखवून नशीबावर अवलंबून राहिल्यास काय परिणाम होईल हें स्पष्ट केलें आहे. ८ उद्योगावर किती विश्वास ठेवावा? यांत उद्योगाचें महत्व व आळसाचा परिणाम दाखवून सर्वस्वीं

उद्योगावर विश्वास ठेवणें चांगलें असें सांगितलें आहे. ९ परिसमाप्ति—यांत स्वतांची उद्योगावरील भक्ति उघड केली आहे.

(२) प्रार्थना. ‘ भिन्नरुचिर्हि लोकः ’ याप्रमाणें प्रत्येकाची आवड वेगळी असणें हें स्वाभाविक आहे. चार जणांनीं ग्रंथ केल्यास ते चार प्रकारचे असतील हें उघड आहे. त्यांतील एक पसंत ठरला, ह्मणजे बाकीचे लोकांच्या पुढें येण्यासही लायक नाहींत, असें मानणें चांगलें नाहीं. आपल्याकडील ग्रंथप्रकाशकांची तूर्त अशी स्थिति आहे. एखाद्या विषयावर एखादा ग्रंथ प्रसिद्ध झाला, ह्मणजे दुसरा त्या विषयावरील ग्रंथ प्रसिद्ध होण्याची किंवा खपण्याची आशा नाहीं, यामुळें हा निबंध असाच पडून रहाणार होता. परंतु त्यास **दक्षिणाप्राइझकमीटी**चा आश्रय मिळण्याचा योग आल्यामुळें तो अशा सुंदर रूपानें लोकसमुदायाच्या दृष्टीस पडत आहे. यास आश्रय देऊन यांतील अल्प गुणांचें सेवन करणें रसिकवर्गाकडे आहे. लोकाश्रयावर याच्या प्रती खपल्यास मला दुसरा एखादा निबंध त्यांच्यापुढें आणण्यास अवसान येईल. रसिकवर्गाकडून यास आश्रय मिळून आणखी ग्रंथरचना करण्यास मला उमेद येवो अशी **परमेश्वरा**ची प्रार्थना करून हा अल्प लेख पुरा करतों.

लोंढे यांनीं केलेलीं उपदेशपर पुस्तकें.

प्रत्येकाची किंमत ८~॥

बोधशतकः—(चौथी आवृत्ति) श्लोकबद्ध. "हें पुस्तक प्रत्येक लहान मुलानें वाचल्याशिवाय व आंतील बोधपर कविता पाठ केल्याशिवाय राहूं नये अशी आमची त्यांना शिफारस आहे." **केसरी.**

संगीत सुधाः—(तिसरी आवृत्ति) साक्या, दिंड्या, पदें, वगैरे कविता. "यांतील कविता सरळ, सोपी व मनावर ठसा उमटण्याजोगी साधली आहे." **सुबोधपत्रिका.**

उपदेशमालाः—(सहावी आवृत्ति) श्लोकबद्ध. "लोंढे यांचा हा प्रयत्न त्यांच्या पूर्वीच्या प्रयत्नाप्रमाणेंच चांगला साधला आहे. कविता सोपी आहे." **विविधज्ञानविस्तार.**

ऐतिहासिक संगीतः—(दुसरी आवृत्ति) साक्या, दिंड्या, पदें, वगैरे कविता. "कविता सुबोध, सोपी व सहजरीतीनें केलेली आहे. इतिहासाचा नाद मुलांस लागण्यास हा चांगला मार्ग आहे." **ज्ञानचक्षु.**

बोधामृतः—श्लोकबद्ध. "पद्यें सुरस, आणि बोध फार चांगला आहे. मुलांनीं अवश्य वाचावें." **बालबोध.**

बोधसुधाः—(दुसरी आवृत्ति) साक्या, दिंड्या, पदें, वगैरे कविता. "मुलांस कवितेंत बोध केला आहे. चांगला व सोपा आहे." **पुणेंवैभव.**

पुष्पगुच्छः—(दुसरी आवृत्ति) "कविता चांगल्या आहेत. मुलांनीं वाचण्यास योग्य आहेत. रा. लोंढे हे अर्वाचीन कवींपैकीं एक आहेत." **मनोरंजननिबंधचंद्रिका.**

पुष्पमाला:—(श्लोकबद्ध) "कविता साधी आणि हृदयंगम उतरली आहे. लोंढे यानीं मुलांकरितां चांगला उपक्रम चालविला आहे." **काव्यरत्नावली.**

पुष्पावली:—(श्लोकबद्ध) "कविता सुबोध व मुलांची कल्पनाशक्ति वाढविणारी अशी झाली आहे." **पुणेंवैभव.**

बोधमाला:—(श्लोकबद्ध) "रा. लोंढे यांस कविता रचण्याची हातोटी चांगली साधली आहे. कित्येक ठिकाणीं बोध चांगला साधला आहे." **इस्राएली धर्मदीप.**

मुलांचें प्राथमिक शिक्षण:—"यांत लहान मुलांस प्रत्येक विषयांत प्राथमिक शिक्षण कसें द्यावें, हें सांगितलें आहे. हें साडेपांच आण्यांचें पुस्तक प्रत्येक शिक्षकास घेतां येणार आहे, व तें सर्वप्रकारें संग्रहणीय आहे." **शाळापत्रक.**

नशीब आणि उद्योग:—(किंमत ।-॥) "विषयाचें प्रतिपादन चांगलें केलें आहे, भाषा सोपी व चटकदार आहे." "निबंध एकंदरीनें चांगला लिहिला असून विषयाचें प्रतिपादन पद्धतवार केलें आहे." "निबंध चांगला उतरला आहे. भाषा सरळ, सोपी व चटकदार आहे." **द. प्रा. क. सभासद.**
